दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०६३ • पुणे • सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



ट्रान्सफॉर्मर देतोय आळंदीकरांना धोक्याची घंटा

3



सार्वजनिक शौचालये अडकली अंधाराच्या विळख्यात!

4



सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारचे पाऊल

भारत टॅक्सी सेवेला प्रारंभ

- NHEC चे पुनरुज्जीवन, सहकार निबंधकांच्या प्रादेशिक कार्यालयाचे उद्घाटन
- उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांची माहिती; अजितदादांचे सहकार क्षेत्रातील योगदान अधोरेखित

पुणे (दै. आरंभ पर्व)

सहकार क्षेत्राला नवी दिशा आणि बळकटी देण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. तळेगाव दाभाडे येथे NHEC संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी भूमिपूजन, केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांच्या प्रादेशिक कार्यालयाचे उद्घाटन आणि सहकारी तत्त्वावर आधारित 'भारत टॅक्सी' सेवेचा शुभारंभ केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर उपस्थित होते. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार म्हणाल्या की, पुण्यात केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांचे प्रादेशिक कार्यालय सुरू झाल्यामुळे महाराष्ट्रासह पश्चिम भारतातील सहकारी संस्थांना स्थानिक पातळीवर आवश्यक सुविधा, मार्गदर्शन आणि प्रशासकीय सहकार्य मिळणार आहे. या कार्यालयाच्या उभारणीसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना पाहणे ही आनंदाची आणि समाधानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

१९७४ मध्ये स्थापन झालेल्या NHEC संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी १,५०० कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून दिली आहे. हा निर्णय संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी आणि सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास सुनेत्रावहिनी पवार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्नही लवकरच मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सहकारी तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या 'भारत टॅक्सी' उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना त्या म्हणाल्या की, हा उपक्रम केवळ रोजगार उपलब्ध करून देणारा नसून चालकांना मालकी हक्क, निर्णय प्रक्रियेतील सहभाग आणि नफ्यात वाटा मिळवून देणारा आहे. पुण्यातील जवळपास ३५ हजार सारथींना या उपक्रमाचा लाभ होणार आहे. महिला चालकांसाठी 'सारथी दीदी' ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच पात्र चालकांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण मिळणार आहे. या उपक्रमामुळे चालकांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याबरोबरच प्रवाशांना परवडणारी आणि सुलभ वाहतूक सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, सहकारी संस्थांना आधुनिक सुविधांशी जोडणे आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना देणे या दृष्टीने हे तिन्ही उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. अजितदादांनी सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना पाहून मनापासून आनंद होत असल्याची भावना सुनेत्रावहिनी पवार यांनी व्यक्त केली.

या तिन्ही महत्त्वपूर्ण उपक्रमांच्या प्रारंभाबद्दल केंद्रीय मंत्री अमित शाह आणि संबंधित सर्वांचे अभिनंदन करून सुनेत्रावहिनी पवार यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सहकार क्षेत्रासाठी अजितदादांचे योगदान महत्त्वपूर्ण

सहकार क्षेत्राच्या विकासासाठी अजितदादांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करताना सुनेत्रावहिनी म्हणाल्या की, सहकारी साखर कारखान्यांचा सुमारे ९,५०० कोटी रुपयांचा प्राप्तिकराचा प्रश्न मार्गी लावण्यात अजितदादांचे मोठे योगदान होते. तसेच मोलॅसिसवरील कर २८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याच्या निर्णयामुळे साखर उद्योगासह ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. सहकार क्षेत्रातील अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी अजितदादांनी सातत्याने प्रयत्न केले होते.

ठळक बातम्या

राहुल गांधींकडून भारताची बदनामी!

पुणे (आरंभ पर्व) : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस पक्ष गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने राजकीय पराभवाचा सामना करत आहे. या नैराश्यातूनच काँग्रेस वेगवेगळ्या प्रकारे आपली नाराजी व्यक्त करत असल्याची टीका अमित शाह यांनी केली. फरिदाबाद येथे आयोजित कार्यक्रमात देशभरातून लोकांना बोलावण्यात आले होते. राहुल गांधीही या कार्यक्रमाला उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर राहुल गांधी यांनी भारतविरोधी वक्तव्ये करून देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अमित शाह यांनी केला. काँग्रेसला निवडणुकीत यश मिळवायचे असेल, तर त्यांनी परदेशात जाऊन भारताची बदनामी करण्याऐवजी गावागावात जाऊन लोकांना भेटावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जगभरात कौतुक होत असताना राहुल गांधी जागतिक व्यासपीठावर भारताच्या विकासाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका अमित शाह यांनी केली.

देवदर्शनाला जाणाऱ्या पुण्यातील कुटुंबावर काळाचा घाला

बेळगावमध्ये भीषण अपघात, कुटुंबातील तिघांचा मृत्यू





कोल्हापूर (दै. आरंभ पर्व)

रस्ते अपघाताच्या घटनांमुळे समाजमन व्यथित होत असून परिसरात हळहळ व्यक्त होते. मात्र, गेल्या काही महिन्यात रस्ते अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं दिसून येतंय. नांदेडमध्ये आज भीषण अपघाताच दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर, आता बेळगाव जिल्ह्याच्या गोकाक तालुक्यातील मालदिन्नी क्रॉसजवळ कार आणि ट्रकची समोरासमोर भीषण धडक होऊन चिमुकल्यासह एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्घटनेनंतर स्थानिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे. तर, संबंधित कुटुंब पुण्यातील (Pune) रहिवाशी असल्याची माहिती समोर आली आहे. बेळगावच्या गोकाक तालुक्यात कार आणि ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने भीषण दुर्घटनेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. त्यात, एका 4 वर्षीय चिमुकल्यालाही आपला जीव गमवावा लागला. या अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, अन्य तिघे गंभीर जखमी झाले आहेत. ओंकार चंद्रशेखर मांडरे (वय २६), रेश्मा मांडरे (वय ३२) आणि देवांश मांडरे (वय ४) अशी मृतांची नावे आहेत.

भरधाव कारच्या धडकेत गाय गंभीर जखमी

- उपचारासाठी आरोग्य अधीक्षकांची कथित उदासीनता!
- फोन करूनही प्रतिसाद नाही; खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

खडकी-अमोल सहारे (दै. आरंभ पर्व)

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने एका गाईला जोरदार धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली. अपघातानंतर जखमी गाईच्या उपचारासाठी खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे आरोग्य अधीक्षक नासिर मुकादम यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांनी फोनला प्रतिसाद न दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मुक्या जनावराच्या उपचारासाठीही प्रशासनाकडून तत्परता दाखवली जात नसेल, तर आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.

खडकीतील ऑल सेंट चौक तसेच खडकी रेल्वे स्टेशनकडून खडकी बिझनेस सेंटरच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर हा अपघात झाला. भरधाव वेगाने आलेल्या कारने रस्त्यावर असलेल्या गाईला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की गाय उडून रस्त्यावर पडली. कार गाईवरून गेल्याचेही परिसरातील सफाई कर्मचाऱ्यांनी सांगितले. कारने



गाईला सुमारे दहा फूट फरफटत नेल्याने तिच्या डोक्याला, नाकाजवळ, शेपटीला आणि पायांना गंभीर दुखापत झाली. जखमांमधून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. धडकेमुळे कारचा पुढील दिवाही तुटला असून त्याच्या काचा रस्त्यावर पडल्या होत्या.

अपघाताचा आवाज ऐकताच परिसरात साफसफाईचे काम करणाऱ्या खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी गाईला पाणी पाजून मदत करण्याचा प्रयत्न केला. अपघातानंतर गाय थरथरत एकाच जागी उभी असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मात्र, गडबडीत संबंधित कारचा क्रमांक नोंदवता आला नसल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले. गैरीसन स्कूलजवळ ही घटना घडल्याने घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

दरम्यान, जखमी गाईच्या उपचारासाठी काही नागरिकांनी आरोग्य अधीक्षक नासिर मुकादम यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी फोन उचलला नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांनी कोणाकडे धाव घ्यायची, असा सवाल उपस्थित होत आहे. आरोग्य अधीक्षक वारंवार फोनला प्रतिसाद देत नसल्याची तक्रारही काही नागरिकांनी केली आहे.

मुक्या जनावराच्या उपचारासाठी तातडीने मदत उपलब्ध होणे अपेक्षित असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नसेल, तर ही बाब गंभीर आहे. गाईच्या जागी एखादी महिला किंवा पुरुष असता आणि अपघातात त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असता, तर प्रशासनाने अशीच उदासीन भूमिका घेतली असती का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

ऑल सेंट चौकातील सिग्नल सुटल्यानंतर खडकी बिझनेस सेंटर तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या दिशेने जाणारी वाहने वेगाने धावत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या रस्त्यावर तीन ठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले आहेत. तसेच जवळच गैरीसन स्कूल आणि सैन्याची काही कार्यालये असल्याने या मार्गावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. ऑल सेंट चौक आणि खडकी रेल्वे स्टेशनकडून येणारी वाहने, तसेच कॉल सेंटरच्या गाड्यांचा वेगही चिंतेचा विषय बनला आहे. या मार्गावरील वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतूक विभागाने अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिक करीत आहेत. दरम्यान, आरोग्य अधीक्षक नासिर मुकादम यांच्याशी या प्रकरणी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची बाजू समजू शकली नाही.

स्वच्छ व सुंदर पुण्याचा बार फुसकाच?



- पालिकेची स्वच्छता मोहीम राहिली कागदोपत्रीच
- डेंग्यू, मलेरिया आजाराची जनता बनते शिकार

सध्या शहरातील विविध भागात डेंगू टायफर मलेरिया आधी भयंकर आजाराने मोठ्या प्रमाणात वीळखा घातल्याने अनेक निष्पाप या भयंकर आजाराला सामोरे जात असताना अनेक निष्पाप जीवांना जीव गमावण्याची वेळ येत असल्यामुळे अशा गंभीर स्वरूपाच्या आजाराला जबाबदार कोण? असा मुख्य सवाल उपस्थित होत असून पालिका प्रशासन राजकीय नेते यावर ठोस पावले उचलणार का? या संभ्रमात सध्या जनता सापडले आहे.

आज पालिका अधिकाऱ्यांच्या निष्काळजी कारभारामुळे शहरातील अनेक निष्पाप जीव हे या महाभयंकर आजाराचे शिकार बनून बळी पडत असताना देखील पालिकेतील घनकचरा किंवा आरोग्य विभागातील अधिकारी गप्प मूग गिळून सर्वसामान्य जनतेचा तमाशा बघण्याचे काम करत असेल.तर जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यावर वरिष्ठ पातळीवर कारवाईची भूमिका काय?घेणार याची आज देखील जनता ही प्रतीक्षा करत आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अनेक निष्पाप जीव सदर आजाराचे बळी पडत असल्याने अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्याची हीच वेळ असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

पुणे: निरंजन उर्फ सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

पालिका अधिकाऱ्यांकडून राबविण्यात येणारा स्वच्छ व सुंदर पुणे शहराचा उपक्रम हा कागदोपत्री राहून तो फुसका बार ठरल्यामुळे शहरातील अनेक भागातील रस्ते कचऱ्याचे आगार बनल्यामुळे सर्वसामान्य जनता ही डेंग्यू यासारख्या महाभयंकर आजाराला सामोरे जाऊन शिकार बनत आहे. पालिका अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असल्याचे स्पष्ट होत आहे. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराची सांस्कृतिक व स्मार्ट सिटी शहर म्हणून जरी ओळख असली तरी पण मध्यंतरीच्या काळात शहरासह उपनगर परिसर हा इतर विविध समस्येसह कचऱ्याच्या विळख्यात अडकल्यामुळे यातून शहराची मुक्तता होण्याच्या उद्देशाने पालिका प्रशासनाच्या वतीने मध्यंतरीच्या काळात स्वच्छ व सुंदर पुणे हा उपक्रम राबविण्याची मोहीम हाती घेण्यात आली होती. मात्र सध्या राबविण्यात येणारी मोहीम ही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अथवा दुर्लक्षित कारभारामुळे कागदोपत्रीच राहिल्याचे दिसून येत आहे. त्यातच शहरातील कचऱ्याचे निवारण करण्यासाठी पालिकेच्या वतीने प्रत्येक विभागात लाखो रुपये खर्च करून कचरा डेपो उभारण्यात आले आहे.मात्र लाखो रुपयांचा खर्च करून देखील शहरातील महत्वाच्या ठिकाणी नागरिक हे रस्त्यावरच टाकत आहेत. त्यामुळे अनेक असलेले रस्ते हे कचऱ्याचे आगार बनल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे साचलेल्या कचऱ्यामुळे ऐन पावसाळ्यात डेंग्यू,मलेरिया यासारख्या महाभयंकर आजाराची साथ पसरली असल्यामुळे मागील आठवड्यातच डेंग्यू या महाभयंकर आजाराची लागण झालेल्या धानोरी परिसरातील निष्पाप व्यक्तीस आपला जीव गमविण्याची वेळ आली. त्यामुळे अशा महाभयंकर आजाराची शिकार बनलेल्या व्यक्तीच्या मृत्यूस जबाबदार कोण? असा संतप्त सवाल जनतेकडून उपस्थित होत आहे. तर अनेक भागात बनविण्यात आलेले कचरा डेपो हे शहराच्या मध्यभागी बनविण्यात आल्याने अशा भागात डासांच्या प्रमाणात वाढ होऊन थैमान घातले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारापुढे सर्वसामान्य जनतेला नतमस्तक होण्याची वेळ येऊन ते गंभीर स्वरूपाच्या आजाराचे बळी पडत आहे. विशेष करून कचऱ्याच्या समस्येने हैराण झालेल्या नागरिक, पक्ष अथवा संघटनेच्या वतीने पालिका अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते. मात्र त्यावेळेस कचरा समस्या लवकर सोडविण्याच्या आश्वासनाला नागरिक बळी पडल्याने अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने ही हवेत विरून फुसका बार ठरली आहेत. यामुळे अधिकाऱ्यांच्या कामकाज संदर्भात शंका उपस्थित होत आहे.त्यामुळे जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांना खरोखर खुर्चीवर बसण्याचा अधिकार आहे का?हा देखील मुख्य प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे.तर नागरिकांनी केलेल्या तक्रारींना पालिका वरिष्ठांकडून केराची टोपली दाखविण्याचे काम केले जात असेल तर शहरातील विविध भागातील जनतेला सुखसुविधा मिळाव्यात या खऱ्या हेतूने पालिकेकडून मोठ्या प्रमाणात कर किंवा पाणीपट्टीच्या रूपात रक्कम आकारण्यात येत असताना देखील जर जनतेला व्यवस्थितपणे पालिका सुविधा देण्यास असमर्थ ठरत असेल तर शहरातील विविध भागांचा पालिकेत समावेश करून उपयोग काय?असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



कानगाव जि. प. गटामध्ये विविध विकास कामाचे शुभारंभ संपन्न

दौंड (आरंभ पर्व) : गार ता. दौंड येथे आज जिल्हा परिषद सदस्य मा.श्री.साहेबराव राजाराम पोळ यांच्या प्रयत्नातुन मंजुर अंगणवाडीकेंद्र दुरुस्ती करणे,गार संभाजीनगर बंदिस्त गटर करणे, जुनिगार पाणीपुरवठा विहिर खोलीकरण करणे. अशा विविध विकास कामांचा शुभारंभ संपन्न झाला यावेळी जिल्हा परिषद सदस्य मा. श्री. साहेबराव राजाराम पोळ, पंचायत समिती सदस्य मा. श्री.बाळासाहेब निवंगुने , श्री. सुरेश नांदखिले, श्री. दत्तात्रय नांदखिले, श्री संजय रणपिसे,श्री. शहाजी लोंढे, श्री. प्रविण रणसिंग, श्री. सुनील घाडगे, श्री. संतोष शितकल, श्री. अनिल नांदखिले, श्री. संपत नांदखिले, श्री. शंकर शितोळे, श्री. शहाजी नांदखिले,श्री संजय भोसले, श्री. राजेंद्र फलके, श्री. नितीन चव्हाण, श्री भुजंग नांदखिले, श्री दादा आटोळे,श्री. सचिन भुजबळ, श्री. ईश्वर नांदखिले, श्री गणेश गायकवाड, श्री संपत शिंदे, श्री विजय सोनवणे,श्री राजेश जगताप,श्री सूरज शितकल, श्री प्रशांत घाडगे, श्री विकास नांदखिले,श्री भरत नांदखिले,श्री अशोक नांदखिले तसेच अंगणवाडी सेविका/मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



दापोडीमध्ये छटपूजा उत्साहात

दापोडी (आरंभ पर्व) : दापोडी, फुगेवाडी, कासरवाडी, सांगवी येथील छठ पूजा साठी उत्तर भारतीय येथून आलेले आपल्या कामकाजासाठी महाराष्ट्रात नागरिक दिवाळी नंतर येणाऱ्या छटपूजेची वाट पाहतात, आणि हा छटपूजा हे तीन दिवस मनोभावे प्रार्थना करून सर्व महिला तीन दिवस उपास करतात. व या उपासामध्ये आपल्या घरामध्ये पूजा करतात. नदी किनारी आपले मंदिर थाटून तेथे चंद्र मावळणाऱ्या वेळेस तेथे सर्व महिला आपल्याबरोबर ऊस नारळ विविध फळे व पूजेचे सर्व सामान घेऊन व तसेच नवीन ड्रेस घालून. व महिला यावेळेस नदीकिनारी येऊन. तेथे रांगोळी च्या पायघड्या घालतात. नदीकिनारी एक वेगळेच धार्मिक वातावरण निर्माण करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतात रस्त्याने जात असतात. त्यावेळेस परिसरामध्ये महिला आपल्या डोक्यावर संपूर्ण छटपूजेचे साहित्य घेऊन जाताना. हा छटपूजेचे एक क्षण छट पूजेचे वेगळेच वातावरण निर्माण करते व ६ नंतर सायंकाळची पूजा झाल्यानंतर येथे त्यांनी छट पूजेसाठी यावेळी आरोग्य कर्मचारी आरोग्य निरीक्षक सचिन जाधव, मुकादम आनंद कांबळे, सुशांत गुजर, मनीषा डोळस, किरण आल्हाट व महावितरण विभागातील अनिल मुलगीर सहाय्यक अभियंता संजय बारहाते, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचा सन्मान यावेळेस करण्यात आला. दुसऱ्या दिवशी सकाळी पहाटे ६ वाजता सूर्य उगवणेच्या वेळेस पुन्हा सकाळी येऊन पूजा करतात. व फटाकडे वाजून छट पूजेचा आनंद करतात यावेळेस महाराष्ट्रातील विविध समाजातील कार्यकर्ते यावेळेस त्यांना छट पूजेच्या शुभेच्छा देण्यास येतात व ते झाल्यानंतर छटपूजा करणाऱ्या महिला व पुरुष यावेळी विशेष गव्हाचे पीठ गुळ साखर दूध यांचे मिश्रण करून प्रसाद वाटतात या प्रसादाला (ठेकुआ) असे म्हणतात या महाप्रसादाचे वाटप करतात, यावेळी ब्रजेश यादव, कमलेश गुप्ता, प्रदीप गुप्ता, सुनील गुप्ता, अनिल गुप्ता, गणेश गुप्ता, मदन गुप्ता, कमलेश गुप्ता, संतोष गुप्ता उपस्थित होते. महिलांनी विशेष पूजेसाठी शिवानी गुप्ता, आरती यादव, गीता देवी सुनिता गुप्ता, चांदनी गुप्ता, शालू गुप्ता, शांती गुप्ता, बिगण देवी, रीना गुप्ता, ज्योती गुप्ता, पूजा गुप्ता या महिलांनी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

भरधाव दुचाकीची बाप-लेकाला जोरदार धडक; ८ वर्षांचा मुलगा जखमी

पिंपरी (आरंभ पर्व) : भरधाव आणि निष्काळजीपणे दुचाकी चालवून चालकाने पायी जाणाऱ्या बाप लेकाला जोरदार धडक दिल्याची घटना तळेगाव चाकण रोडवर घडली. या अपघातात वडिलांचा पाय फ्रॅक्चर झाला असून आठ वर्षांचा मुलगाही गंभीर जखमी झाला आहे. उमेश दत्तात्रय टेकाळे (वय ४०) हे मुलगा शिवांश (वय ८) याच्यासह १३ नोव्हेंबर रोजी रात्री वैष्णवी हॉटेलसमोरून पायी जात होते. त्यावेळी एमएच १४ टी ६७०१ क्रमांकाच्या दुचाकीवरील चालकाने भरधाव वेगात येत दोघांना जोरदार धडक दिली. यात उमेश यांच्या डाव्या पायाला गुडघ्याखाली गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले, तर मुलगा शिवांश याच्या दोन्ही खांद्यांना फ्रॅक्चर झाले. याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.



कॉलेजच्या गेटवरून तरुणाचे अपहरण; डांगे चौकात नेऊन बेदम मारहाण

पिंपरी (आरंभ पर्व) : ताथवडे येथील श्री बालाजी कॉलेजच्या गेटबाहेरून एका तरुणाला मोटारसायकलवर जबरदस्तीने बसवून अपहरण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्यानंतर डांगे चौक परिसरात नेऊन बेल्ट, दगड आणि काठीने बेदम मारहाण करण्यात आली. ओम याला १४ नोव्हेंबर रोजी रामेश्वर साहेबराव तोगरे (वय २२) आणि त्याच्या एका अनोळखी साथीदाराने श्री बालाजी कॉलेजच्या गेटबाहेरून जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून डांगे चौकाकडे नेले. तेथे दोघांनी त्याला हाताने तसेच कमरेचा बेल्ट, दगड आणि काठीने मारहाण केली. या हल्ल्यात ओम याच्या पाठीवर, हातावर, नाकावर आणि डोक्याला गंभीर जखमा झाल्या. याप्रकरणी ओम याचे वडील सुनील केशव होळकर (वय ४०) यांच्या फिर्यादीवरून वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामेश्वर तोगरे आणि एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

वाकडमध्ये पीएनजी ज्वेलर्समध्ये हातचलाखीने

दागिने चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

- ७५ वर्षीय महिलेसह दोघांना अटक
- ६ लाख ३८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

सणासुदीच्या मुहूर्तावर दागिने खरेदीसाठी होणाऱ्या गर्दीचा फायदा घेत दुकानातील कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोघांना वाकड पोलिसांनी अटक केली आहे. यामध्ये ७५ वर्षीय महिलेचाही समावेश आहे. या आरोपींकडून तब्बल ६ लाख ३८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, पी.एन.जी. ज्वेलर्समधील चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑक्टोबर २०२६ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर सायंकाळी भुमकर चौक, वाकड येथील पु. ना. गाडगीळ (पी. एन.जी.) ज्वेलर्समध्ये दागिने खरेदीसाठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत आरोपींनी दुकानातील



कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने ४ लाख ७० हजार रुपये किमतीचे २९.८४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले होते. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याच प्रकारे १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर याच ज्वेलर्समध्ये गर्दीचा फायदा घेत कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून १ लाख ८८ हजार रुपये किमतीचे ११.३७६ ग्रॅम वजनाचे शॉर्ट मंगळसूत्र चोरी करण्यात आले होते. दोन्ही गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांसमोर आरोपींचा शोध घेण्याचे मोठे आव्हान होते. दुकानातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करूनही सुरुवातीला आरोपींचा ठोस सुगावा लागत नव्हता. मात्र, वाकड पोलिसांच्या तपास पथकाने चिकाटीने तपास सुरू ठेवला. पी.एन.जी. ज्वेलर्सपासून कोंढवा, केशवनगर, पुणे परिसरापर्यंतच्या मार्गावरील सरकारी तसेच खासगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. या तपासातून चोरीसाठी वापरण्यात आलेल्या चारचाकी वाहनाची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले.

पोलिसांचा सुगावा लागल्याने आरोपी दुसऱ्या राज्यात जाऊन लपून बसले होते. मात्र, पोलिसांनी त्यांच्यावर नजर ठेवत शोधमोहीम सुरूच ठेवली. आरोपी महाराष्ट्रात परतताच सापळा रचून त्यांना ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत धनराज विजय परमार (वय ४८, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे) याला अटक करण्यात आली. त्यानंतर तपासात निष्पन्न झालेली महिला आरोपी सुचित्रा किशोर साळुंखे (वय ७५, रा. शिंदेवस्ती, केशवनगर, पुणे) हिला अटक करण्यात आली. आरोपींची पोलीस कोठडी घेऊन त्यांच्याकडून दोन्ही गुन्ह्यांतील चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली, पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वाकड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास दराडे, पोलीस उपनिरीक्षक मारणे तसेच तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांनी या कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनिवास दराडे करीत आहेत.



जेजुरीत श्री मार्तंड देवस्थानला २५ लाखांच्या

‘क्युमिन्स २५० केव्हीए’ जनरेटर सेटचे लोकार्पण संपन्न

जेजुरी- निलेश भुजबळ (दै. आरंभ पर्व)

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी येथे निबे लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (MD & CEO) श्री. गणेश निबे यांनी सहकुटुंब श्री खंडोबा देवाचा अभिषेक व मनोभावे पूजन करण्यात केले . या आध्यात्मिक व मंगलमय वातावरणात, निबे कुटुंबातर्फे श्री मार्तंड देवस्थान न्यासाला सुमारे २५ लाख रुपये मूल्य असणाऱ्या ‘क्युमिन्स २५० केव्हीए’ (Cummins 250 KVA) जनरेटर सेट देणगी स्वरूपात अर्पण करण्यात आला .आज अत्यंत उत्साहात या जनरेटर सेटचा लोकार्पण सोहळा पार पडला. या धार्मिक व सामाजिक सोहळ्यानिमित्त श्री मार्तंड देवस्थान न्यासाच्या वतीने मा. अध्यक्ष अॅड विश्वास पानसे आणि मा. विश्वस्त मंगेश घोणे यांनी देणगीदार श्री. गणेश निबे व त्यांच्या कुटुंबीयांचा यथोचित सन्मान करून त्यांचे देवस्थानच्या वतीने विशेष आभार मानले. खंडोबा देवाच्या कृपेने मिळालेल्या या समर्थ सहकार्यामुळे देवस्थानच्या कामकाजात आणि सोयी-सुविधांमध्ये मोठी मदत होणार आहे.

आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवेंना बारामतीत जयंतीनिमित्त अभिवादन!

बारामती (दै. आरंभ पर्व)

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात आपल्या शौर्याने, क्रांतिकारी विचारांनी आणि समाजप्रबोधनाच्या कार्याने अजरामर ठसा उमटविणारे आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त बारामती येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे हे केवळ कुस्ती आणि शस्त्रविद्येचे वस्ताद नव्हते, तर ते सामाजिक समतेचे पुरस्कर्ते, बहुजन समाजाच्या स्वाभिमानाचे प्रेरणास्थान आणि देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करणारे महान क्रांतिकारक होते. त्यांनी आपल्या व्यायामशाळेच्या माध्यमातून तरुणांना शारीरिक सामर्थ्यासोबतच देशप्रेम, स्वाभिमान, अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द आणि संघटित होण्याची शिकवण दिली. महात्मा ज्योतिराव फुले यांचे गुरु म्हणून त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही मोलाचे योगदान दिले. क्रांतिकारकांना शस्त्रविद्या व लढण्याचे प्रशिक्षण देऊन स्वातंत्र्याच्या विचारांना बळ देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. लहुजी वस्ताद साळवे यांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांचे विचार, त्याग, शौर्य आणि समाजहिताची भावना प्रत्येकाने आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

वाफगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी अरुण माघाडे

राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील आर्थिकदृष्ट्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या वाफगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या (विकास सोसायटी) उपाध्यक्षपदी अरुण मधुकर माघाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेच्या संचालक मंडळात ठरल्याप्रमाणे तात्कालीन उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपाध्यक्षपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी येथील खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अरुण माघाडे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तृप्ती संकपाळ यांनी काम पाहिले.



निवडीनंतर पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व बाजार समितीचे माजी सभापती शांताराम चव्हाण तसेच सामाजिक कार्यकर्ते धनंजय भागवत यांच्या हस्ते अरुण माघाडे यांचा शाल, फेटा व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी खेड तालुक्याचे माजी आमदार व जिल्हा बँकेचे संचालक दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शरद बुट्टे पाटील, माजपचे तालुकाध्यक्ष व माजी उपसभापती शांताराम भोसले यांनी नवनिर्वाचित उपाध्यक्षांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सुरेश रणपिसे, माजी सरपंच व संचालक विकास कराळे, भरत थिटे, गोपाळ टाकळकर, सुरेश मांदळे, साहेबराव रामाणे, मंगल मांदळे, शारदा रणपिसे, सामाजिक कार्यकर्ते अमर बोऱ्हाडे, संस्थेचे सचिव दादाभाऊ मांदळे यांच्यासह संस्थेचे संचालक, सभासद व ग्रामस्थ उपस्थित होते. संस्थेची वाढती व्यवसायवृद्धी, सातत्यपूर्ण नफ्याची परंपरा आणि आर्थिक प्रगती यामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण असून, नवनिर्वाचित उपाध्यक्ष अरुण माघाडे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या प्रगतीला आणखी चालना मिळेल, अशी अपेक्षा सभासदांनी व्यक्त केली आहे.

दक्षिण पुणे जिल्हा पत्रकार संघाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

अध्यक्षपदी भोरचे सूर्यकांत किंद्रे : राजकुमार थोरात आणि प्रकाश फाळके यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

पुरंदर (दै. आरंभ पर्व)

दक्षिण पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भोर येथील लोकमतचे प्रतिनिधी सूर्यकांत किंद्रे यांची नियुक्ती करण्यात येत असल्याची घोषणा अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी आज केली आहे.

पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि भौगोलिक अंतराचा विचार करून पुणे जिल्ह्याचे दक्षिण आणि उत्तर असे दोन जिल्हे करण्याचा निर्णय अ. भा. मराठी पत्रकार परिषदेनं घेतला आहे. उत्तर पुणे जिल्हा कार्यकारिणी यापुर्वी जाहीर करण्यात आली आहे.. दक्षिण पुणे जिल्हा कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे. दक्षिण पुणे जिल्ह्यात बारामती, इंदापूर, दौड, पुरंदर, मुळशी, भोर, वेल्हे या तालुक्यांचा समावेश आहे. शिवराज काटकर यांनी आज जाहीर



केलेल्या कार्यकारिणीत राजकुमार थोरात (इंदापूर-बारामती) आणि प्रकाश फाळके (पुरंदर) यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दौडचे जीवन शेंडकर हे सरचिटणीस म्हणून काम पाहतील. कोषाध्यक्ष म्हणून मुळशी येथील पत्रकार विनोद मांझिरे काम पाहतील.. जिल्हा प्रतोद म्हणून बंडू दातीर कार्यभार सांभाळतील.



एम. जी. शेलार यांची परिषद प्रतिनिधी म्हणून फेरनियुक्ती करण्यात आली आहे तर राजेंद्र गवळी आणि दत्तात्रय भोंगळे यांना परिषदेच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नवीन कार्यकारिणीची मुदत एक वर्षांची असून या वर्षात नव्याने सदस्य नोंदणी करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडिया परिषद आणि महिला आघाडीच्या नियुक्त्या लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.

एस.एम. देशमुख, परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, परिषदेचे उपाध्यक्ष गणेश मोकाशी, माजी जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर, पुरंदर तालुका संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय भोंगळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती अध्यक्ष बी.एम.काळे, योगेश कामथे, सचिव अमोल बनकर, कोषाध्यक्ष निलेश भुजबळ यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. परिषदेच्यावतीने दोन्ही जिल्हा कार्यकारिणीची लवकरच बैठक बोलावून नूतन कार्यकारिणीचा सत्कार करण्यात येणार असल्याचे शरद पाबळे यांनी स्पष्ट केले आहे.

मद्यधुंद अवस्थेत भरधाव कारचा धुमाकूळ; वाहनांना धडक

पिंपरी-चिंचवड (दै. आरंभ पर्व)

मद्यप्राशन करून भरधाव वेगाने कार चालवणाऱ्या तरुणाने ताथवडे ते रावेत मार्गावर वाहनांना धडक देत धुमाकूळ घातला. या अपघातात तीन वाहनांचे नुकसान झाले असून रिक्षातील महिला प्रवासी जखमी झाली आहे. अपघातानंतर कार पलटी झाली.

अनुग्रह देविदास सूर्यवंशी (वय २३, रा. हिंजवडी) हा १३ नोव्हेंबर रोजी रात्री ह्युंदाई व्हर्ना कारने जात होता. नरसिंह चौक, ताथवडे येथील सिग्नलवर थांबलेल्या रिक्षाला त्याने पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यानंतर समोरील बलेनो कारचे नुकसान केले. पुढे अजय जेसवाल यांच्या रिक्षालाही धडक दिली. अखेर समाधान हॉटेलसमोर त्याची कार पलटी झाली. या अपघातात रिक्षातील प्रवासी



लक्ष्मी संतोष बन्सल यांच्या डाव्या भुवईला व छातीला दुखापत झाली. तसेच तीन वाहनांचे नुकसान झाले. याप्रकरणी प्रदीप भागोजी सरवसे यांच्या फिर्यादीवरून वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मद्यप्राशन करून निष्काळजीपणे वाहन चालवल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

काळेवाडी उड्डाणपुलावर धोकादायक खड्डा

महापालिका प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करण्याची नागरिकांची मागणी

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी काळेवाडी या दोन भागांना जोडणाऱ्या उड्डाणपुलावर धोकादायक मोठा खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे वाहन चालवताना चालकांना अक्षरशः कसरत करावी लागत असून, अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. तरी महापालिका प्रशासनाचे या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. पिंपरी काळेवाडी उड्डाणपूल हा या परिसरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग आहे. या पुलाच्या जवळच पिंपरीची प्रमुख बाजारपेठ असल्याने खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची तसेच दुचाकी, चारचाकी आणि अवजड वाहनांची या मार्गावरून दिवसभर मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. त्यामुळे पुलावरील खड्डा वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या खड्ड्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अचानक खड्डा समोर आल्याने वाहनाचा तोल जाणे, चाक खड्ड्यात अडकणे किंवा मागून येणाऱ्या वाहनाची धडक बसणे, अशा दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाअभावी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने धोका आणखी वाढतो. पिंपरी बाजारपेठेत खरेदीसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे. महापालिका प्रशासनाने या पुलावरील धोकादायक खड्ड्याची तातडीने पाहणी करून हा खड्ड्याची



आवश्यक दुरुस्ती करावी आणि वाहनचालकांचा प्रवास सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी वाहनचालकांकडून होत आहे. अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



प्रभाग क्रमांक १४ मधील विकासकामांना गती मिळणार

- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक संपन्न

बारामती (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती नगरपरिषदेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्रभाग क्रमांक १४ मधील विविध प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेऊन ती कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आल्याचे प्रभागाचे विद्यमान नगरसेवक नवनाथ बल्लाळ यांच्याकडून सांगण्यात आले. यामध्ये प्रतिभानगर व सुहासनगर येथील घरकुल योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, डीपीआर तयार करण्याचे काम सुरू आहे. या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच दादासो नगर, इंदापूर रोड, वडके नगर, प्रबुद्ध नगर व परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची कामे मार्गी लावण्याबाबत चर्चा झाली. याशिवाय इंदापूर रोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक परिसरातील भीमसृष्टी प्रकल्प मार्गी लावण्यासह प्रभागातील इतर विविध विकासकामांना गती देण्याबाबतही महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव व मुख्याधिकारी पंकज भुसे यांना वरील सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिकांच्या मूलभूत सुविधा, घरकुल, झोपडपट्टी पुनर्वसन आणि सामाजिक स्मारकांच्या विकासाला प्राधान्य मिळणार असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मोबाईल हॅक करून गुगल पेच्या माध्यमातून ७१ हजारांची फसवणूक

- मरकळ येथील वाहनचालकाला सायबर चोरट्यांचा गंडा

पिंपरी (आरंभ पर्व) : मोबाईल हॅक करून गुगल पेच्या माध्यमातून बँक खात्यातून तब्बल ७१ हजार ५०० रुपये परस्पर वर्ग करून आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार मरकळ येथे उघडकीस आला आहे. अविनाश भाऊसाहेब साबळे (वय ३२, रा. पाटील वस्ती, मरकळ) यांच्या मोबाईल क्रमांकाचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीने त्यांच्या परवानगीशिवाय गुगल पेच्या माध्यमातून युनियन बँकेच्या खात्यातील ७१ हजार ५०० रुपये दुसऱ्या खात्यात वर्ग करून त्यांची फसवणूक केली. ही घटना ३ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आदित्य मोहन वाघ (वय २७, रा. दहिगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जुन्या भांडणातून रिक्षाचालकावर कोयत्याने हल्ला; तरुणावर वार

पिंपरी (आरंभ पर्व) : जुन्या भांडणाचा राग मनात धरून दोन तरुणांनी रिक्षाचालकावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना कासारवाडीतील विकासनगर येथे १४ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री घडली. या हल्ल्यात तरुणाच्या दोन्ही हातांच्या बोटांना दुखापत झाली आहे. अलीम मेहबूब नागोर (वय २२, रा. विकासनगर, कासारवाडी) हे आईसोबत मोटारसायकलवरून घरी जात असताना बिलाल मशिदीसमोर मित्रांसोबत थांबले होते. त्यावेळी ओळखीचे आरोपी जय्याज शेख आणि अमन बागवान यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून त्यांना शिवीगाळ व दमदाटी सुरू केली. यावेळी एका आरोपीने लोखंडी कोयता काढून अलीम यांच्यावर वार केले. त्यात त्यांच्या उजव्या व डाव्या हाताच्या बोटांना दुखापत झाली. याप्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. यातील एक आरोपी अटक असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पत्नीला रस्त्यात अडवल्याचा जाब विचारल्याने पतीवर जीवघेणा हल्ला

पिंपरी (आरंभ पर्व) : पत्नीला रस्त्यात अडविल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून तरुणावर तिघांनी मिळून जीवघेणा हल्ला केल्याची घटना सावरदरी येथे घडली. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. रोहित रोशनलाल नकले (वय २५, रा. सावरदरी) हे १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कंपनीतून काम संपवून घरी जात असताना स्पार्क मिंडा कंपनीच्या गेटजवळ सुरज दवणे व त्याच्या दोन साथीदारांनी त्यांना अडवले. पत्नी स्वाती हिला रस्त्यात का अडवले, असा जाब विचारल्याच्या रागातून आरोपींनी शिवीगाळ व धमकी देत लाकडी दांडका, वायर आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी सुरज दवणे याने रोहित यांच्या डोक्यावर लाकडी दांडक्याने जोरदार वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरज दवणे व त्याच्या दोन साथीदारांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन महाडीक करीत आहेत.

जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापकांची ज्ञाननिर्मितीत भरारी

- पाच पुस्तकांचे प्रकाशन
- PCI च्या सुधारित अभ्यासक्रमावर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित पुस्तके प्रकाशित
- लेखक प्राध्यापकांचा संस्थेतर्फे विशेष सन्मान

जुन्नर (आरंभ पर्व) : फार्मसी शिक्षणाचा दर्जा उंचावण्याबरोबरच विद्यार्थ्यांना अद्ययावत आणि दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राध्यापकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) च्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) आधारित पाच शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन महाविद्यालयात उत्साहात पार पडले. प्राध्यापकांनी अध्यापनासोबतच पुस्तक लेखनाच्या माध्यमातून ज्ञाननिर्मिती क्षेत्रात दिलेल्या योगदानाचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यास जयहिंद शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, डॉ. शुभांगी गुंजाळ, पुणे येथील प्रसिद्ध वक्ते डॉ. प्रवीण बुगे, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. अमोल उबाळे, प्रा. सुभाष आंद्रे, प्रा. राजकुमार मानकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बी. फार्मसीच्या सुधारित अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना विषय सहज समजावेत आणि त्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करता यावीत, या उद्देशाने महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सोप्या व अभ्यासपूर्ण भाषेत या पुस्तकांची निर्मिती केली आहे.

कष्टकरी सफाई कामगार आणि रिक्षाचालकांची दिवाळी गोड!



पुणे (दै. आरंभ पर्व)

समाजाच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणारे सफाई कामगार, आरोग्य कर्मचारी, रिक्षाचालक आणि विद्युत कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा उपक्रम बोपोडी येथे राबविण्यात आला. विद्यमान उपमहापौर परशुराम वाडेकर, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर आणि मित्र परिवाराच्या वतीने दिवाळी स्नेहभेट समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. बोपोडी येथील सम्यक विहार व विकास केंद्र येथे हा उपक्रम उत्साहात पार पडला. गेल्या १५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यंदाही औंध क्षेत्रीय कार्यालय, बाबुराव शेवाळे हॉस्पिटल, चिखलवाडी आरोग्य केंद्र, बोपोडी आरोग्य केंद्र आणि संजय गांधी रुग्णालय आरोग्य कोठी येथील सफाई कर्मचारी, मुकादम, तसेच प्रभागातील रिक्षाचालक आणि विद्युत कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त मिठाई व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

आरंभचा टोला!



पुणेकरांची कोंडी, व्हीआयपींची सवारी! सत्ताधाऱ्यांचा ताफा सुसाट, पण सामान्य पुणेकरांचा प्रवास ठप्प!

ट्रान्सफॉर्मर देतोय आळंदीकरांना धोक्याची घंटा

- महावितरण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर
- ट्रान्सफॉर्मरमुळे वारकऱ्यांचा जीव धोक्यात
- ट्रान्सफॉर्मर बनतोय मृत्यूचा सापळा

पुणे (दै. आरंभ पर्व)

श्री क्षेत्र आळंदी या ठिकाणी पिंपरी चिंचवड पालिका हद्दीत समावेश असलेल्या इंद्रायणीनगर भागात महावितरण विभागाच्या वतीने पदपथावर उभारण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर हा येणाऱ्या भाविकांसाठी धोक्याची घंटा देऊन मृत्यूचा सापळा बनल्याने येथे येणाऱ्या भाविकांसाठी ट्रान्सफॉर्मर मृत्यूचा सापळा बनल्याने महावितरण विभाग अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. संपूर्ण राज्यातील वारकऱ्यासह भाविकांचे श्रध्दा व आशास्थान असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवनी समाधी सोहळ्या निमित श्री क्षेत्र आळंदी परिसराला पवित्रस्थान मानले जात असल्याने श्रींच्या समाधी सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी राज्यातूनच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातून वारकरी संप्रदायासह भाविकांचा जनसागर या ठिकाणी दर्शनासाठी लोटल्याचे चित्र नेहमीच पाहायला मिळत आहे.याबरोबरच संजीवनी समाधी सोहळा मंदिरालगतच पवित्र मानली जाणारी इंद्रायणी नदी वाहत आहे. त्यामुळे मंदिरासह येथील नदीपात्रात देखील भाविकांची वर्दळ दिसून येते.

त्यातच नदीपात्रालगत असलेला उत्तरेकडील भागाचा खेड तर दक्षिणेकडील भागाचा हवेली तालुक्यात समावेश होतो. हे एक श्री क्षेत्र आळंदीचे वैशिष्ट्य मानले जात असताना उत्तरेकडील परिसराचा आळंदी नगरपरिषद तर दक्षिण भागाचा पिंपरी_चिंचवड पालिकेत समावेश करण्यात आला आहे.राज्याच्या कानाकोपऱ्यातून पायी येणाऱ्या भाविकांसाठी पालिकेच्या वतीने निकृष्ट दर्जाचे पदपथ उभारले असले तरी पण या परिसरातील स्थानिक नागरिकांसह येणाऱ्या भाविकांसाठी सुरळीत वीजपुरवठा होण्याच्या उद्देशाने महावितरण विभागामार्फत एक नव्हे तर दोन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहेत.

मात्र पदपथावर उभारण्यात आलेला एक ट्रान्सफॉर्मर हा चुकीच्या पद्धतीने बसवून तो पूर्णतः झुकता झाल्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या पादचारी नागरिकांसह वाहनचालकांसाठी धोकादायक बनला आहे.त्यातच महिनाभरावर श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे श्री पंढरपूरकडे प्रस्थान होणार असल्यामुळे त्यादरम्यान राज्यातील अनेक दिंड्यांचे या पवित्रस्थळी प्रस्थानासाठी आगमन होणार असून संबंधित कालावधी हा पावसाच्या दिवसाचे असल्याने पावसाळ्यात धोकादायक असलेला पोळ जमीनदोस्त झाल्यावर भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अशा वेळेस गंभीर स्वरूपाची घटना घडल्यास यास जबाबदार कोण?असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.विशेष करून नुसता ट्रान्सफॉर्मरच नाही तर या मार्गावरील बहुतांश प्रमाणात असलेले विद्युत पोल देखील अशा पद्धतीने धोकादायक बनले आहेत. त्यामुळे या मार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊनच जाण्याची वेळ येऊन संबंधित मार्ग हा आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चाकणसह खेड शहराकडे देखील जात असल्यामुळे वाहनांची देखील वर्दळ तेवढ्याच प्रमाणात दिसून येत आहे.

धोकादायक बनलेले ट्रान्सफॉर्मर अथवा विद्युत पोल यांची व्यवस्थितपणे उभारणी करण्यात यावी.यासाठी स्थानिक नागरिक हे महावितरण अधिकाऱ्याकडे निवेदनाव्दारे अथवा प्रत्यक्ष भेटून तो दुरुस्त करण्याची मागणी करून देखील नागरिकांच्या मुख्य समस्येकडे अधिकाऱ्यांनी पाठ फिरवून केराची टोपली दाखविल्यामुळे झोपी गेलेल्या महावितरण अधिकाऱ्यांना दुर्घटना घडल्यावरच जाग येणार का?असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित होत आहे. त्यामुळे सर्वासाठी धोकादायक बनलेला ट्रान्सफॉर्मर अथवा विद्युत पोल हे इतरत्र स्थलांतरित करावे किंवा त्यांची सुरळीत उभारणी करण्यात यावी.या मागणीला आळंदीकराकडून जोर धरू लागली आहे.

अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा चव्हाट्यावर

गेल्या काही वर्षापासून या भागात वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी उभारण्यात आलेला ट्रान्सफॉर्मर तसेच विद्युत पोल हे धोकादायक बनून देखील यावर महावितरण विभाग अधिकाऱ्याकडून आजपर्यंत ठोस पाऊले उचलण्यात न आल्यामुळे महावितरण अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा उजेडात आला आहे.

श्री क्षेत्र आळंदी अथवा नजीकच्या उपनगर भागातच महावितरणचे अधिकारी अथवा कर्मचारी हे वास्तव्य करत असताना देखील नागरिकांसाठी धोक्याची घंटा देणारे ट्रान्सफॉर्मर किंवा विद्युत पोल निदर्शनास येत नाही का?याबाबत आळंदीकरामध्ये शंका उपस्थित होऊन आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तरी महावितरण अधिकाऱ्यांनी यावर ठोस उपाययोजना करणे ही काळाची गरज असून अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



चाकणकरांच्या आधीच तृप्ती देसाईंनी नोंदवला 'ट्रेडमार्क'!

रूपाली चाकणकरांच्या ट्रेडमार्क अर्जावर तृप्ती देसाईंची प्रतिक्रिया; २०२१ मध्येच नाव आणि छायाचित्राचे कायदेशीर संरक्षण मिळवल्याचा दावा

पुणे (दै. आरंभ पर्व)

राज्याच्या राजकीय वर्तुळात सध्या रूपाली चाकणकर यांच्या नावाच्या आणि छायाचित्राच्या ट्रेडमार्क नोंदणीचा विषय चर्चेत असतानाच सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी याबाबत महत्त्वपूर्ण खुलासा केला आहे. चाकणकर यांच्या आधीच आपण २०२१ मध्ये स्वतःचे नाव, वैयक्तिक ओळख आणि छायाचित्र यांचे ट्रेडमार्क नोंदणीद्वारे कायदेशीर संरक्षण मिळवले असून, त्याचे प्रमाणपत्रही भारत सरकारकडून प्राप्त झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. रूपाली चाकणकर यांनी स्वतःचे नाव, वैयक्तिक ओळख आणि छायाचित्र यासंदर्भात भारत सरकारकडे ट्रेडमार्क नोंदणीसाठी अर्ज केल्याची माहिती समोर आली आहे. यावर प्रतिक्रिया देताना तृप्ती देसाई म्हणाल्या की, ट्रेडमार्क नोंदणीसाठी अर्ज करणे आणि प्रत्यक्ष नोंदणी मंजूर होऊन प्रमाणपत्र मिळणे या दोन वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. त्यामुळे केवळ अर्ज केला म्हणून ट्रेडमार्क मंजूर झाला, असे म्हणता येणार नाही. आपणही महिला सक्षमीकरणासाठी अनेक सामाजिक आंदोलने आणि लढे उभारले आहेत. या आंदोलनांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या आपल्या नावाचा किंवा छायाचित्राचा कोणी गैरवापर करू नये, या उद्देशाने १९९९ च्या ट्रेडमार्क कायद्यानुसार २०२१ मध्येच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर भारत सरकारकडून आपल्याला अधिकृत प्रमाणपत्रही मिळाले आहे, असे देसाई यांनी स्पष्ट केले. रूपाली चाकणकर यांनी स्वतःच्या नावाचा किंवा छायाचित्राचा गैरवापर रोखण्यासाठी कायदेशीर पाऊल उचलले असेल, तर त्याचे आपण स्वागत करतो, असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक महिलेने आपल्या कर्तृत्वातून निर्माण झालेली ओळख आणि स्वतःचे नाव यांना कायदेशीर संरक्षण देणे गरजेचे आहे. आपणही याच विचारातून २०२१ मध्ये हे पाऊल उचलले होते, असे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे, स्वतःच्या ट्रेडमार्क नोंदणीबाबत आपण यापूर्वी जाहीरपणे भाष्य केले नव्हते. मात्र, चाकणकर यांच्या ट्रेडमार्क अर्जाची चर्चा सुरू झाल्यानंतर आपली नोंदणी २०२१ मध्येच झाल्याची माहिती समोर आणणे आवश्यक वाटल्याचे देसाई यांनी सांगितले.



दरम्यान, ट्रेडमार्क नोंदणीच्या मुद्द्यावरून आता रूपाली चाकणकर आणि तृप्ती देसाई यांच्या नावांची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, ट्रेडमार्क अर्ज, त्याची मंजुरी आणि प्रत्यक्ष नोंदणी प्रमाणपत्र या प्रक्रियांमधील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे ठरणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



कोलवडी-साष्टेच्या उपसरपंचपदी निशा श्रीकांत भोर बिनविरोध

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निशा श्रीकांत भोर यांची बिनविरोध निवड पार पडली. या बिनविरोध निवडीद्वारे ग्रामपंचायतीने पुन्हा एकदा उपसरपंच बिनविरोध निवडीची परंपरा राखली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या निवड प्रक्रियेत सरपंच विनायक गायकवाड व ग्रामविकास अधिकारी सुजाता पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड पार पडली. यामध्ये उपसरपंच पदासाठी निशा श्रीकांत भोर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बहुमताने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन गायकवाड, रमेश मदने, स्वप्निल नितनवरे, तसेच सदस्या शितल भाडळे, चैत्राली गायकवाड, स्वाती गायकवाड, प्रिया गायकवाड तसेच यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामदास सिताराम गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य पोपट गायकवाड, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती शशिकांत गायकवाड, यशवंतचे माजी संचालक अशोक गायकवाड, मिलापचंद गायकवाड, जयसिंग गायकवाड, माजी सरपंच सतिश गायकवाड, बाळासाहेब भाडळे, दिलीप गायकवाड, विकास कांचन, विलास भोसले, राजू गायकवाड, विश्वास गायकवाड, अशोक गायकवाड, अमर गायकवाड, किरण शितोळे, बाळासो पवार, नारायण मोरे, सुभाष गायकवाड, नंदू भोर, संजय रिकामे, माऊली रिकामे, गणेश भोर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. कोलवडी-साष्टे गाव आदर्श बनविण्याचे ध्येय - ग्रामस्थांनी व सर्व सदस्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांची ऋणी आहे. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन पारदर्शक व विकासाभिमुख कामकाज करण्याचा माझा प्रयत्न राहील असे नवनिर्वाचित उपसरपंच निशा श्रीकांत भोर यांनी सांगितले.

राष्ट्रउभारणीसाठी लहुजी वस्ताद साळवे यांचे विचार आजही प्रेरणादायी – प्रा. निखिल तांबे

बारामतीत सकल हिंदू समाजाच्या वतीने २३२ वी जयंती उत्साहात साजरी; लखनजी जाधव यांना 'लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार' प्रदान

बारामती-केदार पाटोळे
(दै. आरंभ पर्व)

आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त सकल हिंदू समाजाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनकार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा आणि राष्ट्रभक्तीच्या प्रेरणादायी इतिहासाचा जागर करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी लहुजी वस्ताद यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले.



कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा इतिहास अभ्यासक प्रा. निखिल तांबे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात लहुजी वस्ताद साळवे यांच्या ऐतिहासिक योगदानाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपले आयुष्य समर्पित केले. क्रांतिकारकांनी राष्ट्रासाठी दिलेले बलिदान देश कधीही विसरणार नाही. आजच्या राष्ट्रउभारणीच्या कार्यासाठी लहुजी वस्ताद साळवे यांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांची राष्ट्रनिष्ठा आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत आदर्श व प्रेरणादायी आहेत.

पुढे बोलताना त्यांनी लहुजी वस्ताद यांच्या कार्याचा ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट केला. पुण्यातील गंज पेठ येथे त्यांनी तालीम उभारून तरुणांना शारीरिक सामर्थ्य, शस्त्रविद्या, शिस्त, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीचे धडे दिले. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक क्रांतिकारी विचारांचे कार्यकर्ते घडले. वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, उमाजी नाईक आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासारख्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांशी त्यांच्या कार्याचा संबंध अधोरेखित करत त्यांनी लहुजी वस्ताद यांच्या तालमीचे सामाजिक व राष्ट्रीय महत्त्व विशद केले. लहुजी वस्ताद यांनी केवळ शरीरसामर्थ्य वाढविण्याचे काम केले नाही, तर तरुणांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा, अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द आणि देशासाठी काहीतरी करण्याची भावना निर्माण केली, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे 'सव्यासाची गुरुकुलम'चे प्रमुख तथा शिवकालीन शस्त्रविद्या प्रशिक्षक लखनजी जाधव यांना प्रतिष्ठेचा 'लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. शिवकालीन शस्त्रविद्या आणि पारंपरिक युद्धकलेच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना लखनजी जाधव यांनी आजच्या तरुण पिढीमध्ये शिवकालीन शस्त्रविद्या शिकण्याची गरज अधोरेखित केली. शिवकालीन युद्धकला ही केवळ लढण्याची कला नसून ती शिस्त, आत्मविश्वास, धैर्य, शारीरिक क्षमता आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व शिकवणारी परंपरा आहे. नव्या पिढीने या पारंपरिक विद्येचे महत्त्व समजून घेऊन तिचे जतन व संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अक्षय गंगावणे यांनी अध्यक्षीय भाषणातून समाजातील एकजूट, सांस्कृतिक परंपरा आणि हिंदुत्वाच्या विचारांचे महत्त्व विशद केले. "हिंदुत्वाच्या रक्षणासाठी जोशी समाज नेहमीच सर्वांच्या अगोदर असेल," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. समाजातील तरुणांनी संघटित होऊन सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

लहुजी वस्ताद साळवे यांचे जीवन म्हणजे शौर्य, स्वाभिमान, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जागृतीचा प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, क्रांतिकारकांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला करून देणे आणि राष्ट्रप्रेमाची भावना रुजविणे, हा या कार्यक्रमामागील महत्त्वपूर्ण उद्देश असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले. या कार्यक्रमास बारामती परिसरातील हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या विचारपूर्ण मार्गदर्शनामुळे आणि पुरस्कार वितरण सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि राष्ट्रउभारणीसाठी कार्य करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. भार्गव पाटसकर यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा मांडत आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रताप गावडे यांनी केले.

स्वच्छ पुण्यातील सार्वजनिक शौचालये अडकली अंधाराच्या विळख्यात!

पालिकेच्या कोट्यवधींच्या खर्चानंतरही नागरिकांची गैरसोय

दिवे, स्वच्छता आणि सुरक्षेचा अभाव, प्रशासनाचे दुर्लक्ष कधी संपणार?



शहरातील सार्वजनिक शौचालयांची नियमित पाहणी करणे, स्वच्छता राखणे, पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देणे, चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरक्षा उपाययोजना करणे आणि मोडकळीस आलेल्या बांधकामांची दुरुस्ती करणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, वारंवार तक्रारी करूनही समस्यांचे निराकरण होत नसेल, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

पुणे (दै. आरंभ पर्व)

स्वच्छ व सुंदर शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. पुणे महानगरपालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेली अनेक सार्वजनिक शौचालये सध्या अंधाराच्या विळख्यात अडकली आहेत. काही ठिकाणी विद्युत दिव्यांचा अभाव, तर काही ठिकाणी अस्वच्छता, चोरीच्या घटना आणि मोडकळीस आलेल्या बांधकामांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. स्वच्छतेचा नारा देणाऱ्या महापालिका प्रशासनाला या समस्यांकडे लक्ष देण्यासाठी आणखी किती काळ लागणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

ऐतिहासिक वारसा आणि विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची देशभर ओळख आहे. मात्र, शहरातील मूलभूत नागरी सुविधांची अवस्था पाहता स्वच्छ व सुंदर पुणे ही संकल्पना प्रत्यक्षात कितपत उतरली आहे, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही काळापूर्वी शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. त्यावर उपाय म्हणून पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाने स्वच्छ व सुंदर पुणे हा उपक्रम हाती घेतला. मात्र, आजही अनेक भागांत अस्वच्छता आणि दुर्गंधीचे साम्राज्य कायम असल्याचे चित्र दिसत आहे.

शहरात रोजगार, व्यवसाय आणि शिक्षणाच्या निमित्ताने ग्रामीण भागासह विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून महापालिकेने शहर व उपनगरांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि तात्पुरत्या स्वरूपातील शौचालयांची व्यवस्था केली आहे. मात्र, यापैकी अनेक ठिकाणी योग्य देखभाल होत नसल्याने ही स्वच्छतागृहे नागरिकांसाठी गैरसोयीची ठरत आहेत. काही ठिकाणी मद्यपींचा वावर वाढल्याने सार्वजनिक शौचालयांचे परिसर दारू पिण्याचे अड्डे बनत असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे स्वच्छतेबरोबरच सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

यातच अनेक सार्वजनिक शौचालयांमध्ये विद्युत दिव्यांची व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारातच या सुविधांचा वापर करावा लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरत आहे. अंधाराचा फायदा घेत चोरीच्या घटना घडण्याची भीतीही नागरिकांमध्ये आहे. शौचालयात गेलेल्या व्यक्तीचे पाकीट किंवा अन्य वस्तू चोरीला गेल्यास त्याला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे सार्वजनिक शौचालयांमध्ये पुरेशी प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षिततेची उपाययोजना करणे अत्यावश्यक बनले आहे. केवळ अंधाराची समस्याच नव्हे, तर अनेक शौचालयांच्या परिसरात कचऱ्याचे ढीग साचलेले असून अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरत आहे. काही ठिकाणी हात धुण्यासाठी बेसिनची व्यवस्था नाही, तर काही ठिकाणी बसविण्यात आलेले बेसिन आणि अन्य साहित्य चोरट्यांनी लंपास केल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी, नागरिकांना स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांपासूनही वंचित राहावे लागत आहे. अनेक शौचालयांच्या इमारतींची अवस्था मोडकळीस आलेली असून त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान, काही सार्वजनिक शौचालयांच्या बाहेरील भिंतींवर विविध कंपन्यांकडून परवानगीशिवाय जाहिरातींचे पोस्टर लावले जात असल्याचेही निदर्शनास येत आहे. अशा प्रकारांवर महापालिका प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने जाहिरातदारांना अभय कोणाचे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. एकीकडे सार्वजनिक मालमत्तेची देखभाल करण्याची जबाबदारी महापालिकेची असताना दुसरीकडे तिची दुरवस्था होत असताना संबंधित अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेत आहेत, याबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे.

विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाकडून गोशाळेत चारा वाटप

बारामती (दै. आरंभ पर्व)

सामाजिक बांधिलकी जपत नेहमीच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या विष्णुपंत चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने बारामतीचे ॲड. भार्गव पाटसकर यांच्या वाढदिवसानिमित्त जळगाव (बारामती) येथील माँ कामधेनू गोसेवा संघ गोशाळेत चारा वाटपाचा स्तुत्य उपक्रम उत्साहात संपन्न झाला.



दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता मुक्या जनावरांना चारा उपलब्ध व्हावा, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. केवळ वाढदिवस साजरा न करता समाजातील गरजू घटकांसह मुक्या प्राण्यांची सेवाही करता येते, याचा आनंद काही वेगळाच असतो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी छायाचित्रकार प्रशांत कुचेकर (उपाध्यक्ष, बारामती तालुका फोटोग्राफर संघटना) आणि निवेदक व सूत्रसंचालक सलीम सय्यद यांच्या शुभहस्ते चारा वाटप करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष चिऊ जंजिरे, कार्याध्यक्ष नरेंद्र मिसाळ, विठ्ठल आगवणे, पवन राजे बनसोडे, गरुड कमांडो नेताजी बुरुंगले फौजी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसाच्या निमित्ताने सेवाभावाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास्पद ठरला.

भोलावडे येथे चारा साक्षरता अभियान व बियाणे वाटप उत्साहात संपन्न

भोर (दै. आरंभ पर्व)

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भोर यांच्या संयुक्त विद्यमाने, जिल्हा परिषद सदस्य प्रवीण जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (दि.१३) रोजी भोलावडे येथे "चारा साक्षरता अभियान तथा वैरण व मका बियाणाचे वाटप कार्यक्रम" पार पडला. भविष्यात संभाव्य दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये आणि पशुपालकांना योग्य वेळी चारा उपलब्ध व्हावा, या दूरदृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा लाभ भोलावडे जिल्हा परिषद गटातील भोलावडे, बसरापूर, किवत, सांगवी (ही.मा.), येवली आणि बारे खुर्द या गावांमधील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने घेतला. यावेळी कार्यक्रमामध्ये पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त डॉ. किशोर मुळे आणि जिल्हा परिषद सदस्य प्रवीण जगदाळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आगामी काळातील चाऱ्याचे अचूक नियोजन आणि आधुनिक पद्धतीने चारा तयार करण्याच्या पद्धतींवर बहुमूल्य मार्गदर्शन केले.



इंडेल मनीच्या नफ्यात २२२ टक्क्यांची भरारी

पुणे (दै. आरंभ पर्व)

इंडेल समूहाचा भाग असलेल्या आणि सुवर्णकर्ज क्षेत्रात कार्यरत असलेल्या इंडेल मनी लिमिटेड या अग्रगण्य बिगर बँकिंग वित्तीय कंपनीने (एनबीएफसी) सप्टेंबर २०२६ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने या तिमाहीत ७९.९८ कोटी रुपयांचा करानंतरचा नफा (पीएटी) नोंदवला असून, गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत त्यात २२२ टक्क्यांची प्रभावी वाढ झाली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी या निकालांना मंजुरी दिली. सप्टेंबर २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत (एच१एफवाय२७) कंपनीने १०७.६२ कोटी रुपयांचा करानंतरचा नफा नोंदवला. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ही वाढ १२१ टक्के आहे. कंपनीच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्तेत (एयूएम) वार्षिक तुलनेत ८३ टक्क्यांची वाढ होऊन ती ५,०१५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. कंपनीचे निव्वळ उत्पन्न १११ टक्क्यांनी वाढून १५९.८१ कोटी रुपये झाले, तर निव्वळ व्याज उत्पन्नात (एनआयआय) ११८ टक्क्यांची वाढ होऊन ते १४५ कोटी रुपयांवर पोहोचले. कंपनीच्या मुख्य व्यवसायाची नफाक्षमता दर्शवणाऱ्या तरतुदीपूर्व परिचालन नफ्यात (पीपीओपी) १८२ टक्क्यांची वाढ होऊन तो ९८.९५ कोटी रुपयांवर पोहोचला. कंपनीची एकूण अनुत्पादित मालमत्ता (जीएनपीए) १.४१ टक्के इतकी नोंदवण्यात आली असून, मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात घट झाली आहे. दुसऱ्या तिमाहीत कंपनीचा मालमत्तेवरील परतावा (आरओए) ६.८५ टक्के, तर पहिल्या सहामाहीत ४.८५ टक्के राहिला.

INDEL MONEY

ग्रामपंचायत स्वामी चिंचोली, ता. दौंड, जि. पुणे

बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२६-२७

ग्रामपंचायत स्वामी चिंचोली, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत स्वामी चिंचोली, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक १६/११/२०२६ ते दिनांक २०/११/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक १६/११/२०२६ ते दिनांक २०/११/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	निवीदा विक्री करण्याचा कालावधी	निवीदा फी	इसारा रक्कम
१	मौजे स्वामी चिंचोली न.पा.पु. योजना टाकी दुरुस्ती करणे	२२९९६४/-	दि. १६/११/२०२६ ते दि. २०/११/२०२६	२३६/-	खुला- २२९९

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत स्वामी चिंचोली PDCC बँक भिगवण शाखा खाते क्र. ०२८००२५०००००११ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत स्वामी चिंचोली ग्रामनिधी खाते PDCC बँक भिगवण शाखा खाते क्र. ०२८००२५०००००११ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत स्वामी चिंचोली यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत स्वामी चिंचोली, ता. दौंड, जि.पुणे

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



छत्रपती हायस्कूल, येणेरे विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

जुन्नर (आरंभ पर्व) : माजी विद्यार्थी स्नेहमेळावा अतिशय उत्साहात, आनंदात आणि अविस्मरणीय वातावरणात पार पडला. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेले मित्र-मैत्रिणी, आदरणीय शिक्षकांच्या भेटी, जुन्या आठवणी आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे आजचा दिवस खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला. या मेळाव्याच्या निमित्ताने केवळ जुन्या आठवणींना उजाळा मिळाला नाही, तर आपल्या शाळेसाठी भविष्यात काय करता येईल, पुढील उपक्रमांची दिशा काय असावी, याबाबत अनेक नवीन विचार आणि संकल्पनाही समोर आल्या. आजच्या मेळाव्याने आपल्याला एक नवी उमेद, नवा आत्मविश्वास आणि नव्या भरारीसाठी प्रेरणा दिली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व माजी विद्यार्थी बंधू-भगिनींचे, उपस्थित राहिलेल्या सर्व आदरणीय शिक्षकांचे, आयोजनासाठी मेहनत घेणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आणि आर्थिक व इतर स्वरूपात मदत करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार! विशेष म्हणजे, आपली उपस्थिती आणि सहभाग यामुळेच या पहिल्या मेळाव्याला खऱ्या अर्थाने शोभा आली. आज पाया घातला गेला आहे... आता या पायावर एक भक्कम वास्तू उभी करायची आहे! आपला हा स्नेहमेळावा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम न राहता, आपल्या शाळेच्या आणि भावी पिढीच्या विकासासाठी एक चळवळ बनावी, हीच अपेक्षा! चला, जुन्या आठवणींची शिदोरी घेऊन, नवीन विचारांची ऊर्जा आणि नवी उमेद मनात ठेवून पुढील वाटचालीसाठी सज्ज होऊया! असा विश्वास माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

फिक्स्ड ब्रॉडबँड सेवांमध्ये एअरटेलची आघाडी; पाचही श्रेणींमध्ये अव्वल स्थान


नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतातील फिक्स्ड ब्रॉडबँड सेवांच्या कामगिरीत भारती एअरटेलने उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. Opensignal च्या नोव्हेंबर २०२६ मधील इंडिया फिक्स्ड ब्रॉडबँड एक्सपीरियन्स अहवालानुसार, एअरटेलने पाचही श्रेणींमध्ये पहिले स्थान मिळवले आहे. इंटरनेटचा वेग, नेटवर्कची विश्वासार्हता, अपलोड आणि डाउनलोड स्पीड तसेच व्हिडिओ अनुभव या निकषांवर एअरटेल, रिलायन्स जिओ आणि भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) यांच्या सेवांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. अहवालानुसार, नेटवर्कच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत एअरटेलला ४८६ गुण मिळाले आहेत. याउलट रिलायन्स जिओला ४२३, तर बीएसएनएलला ४१९ गुण मिळाले. इंटरनेटच्या वेगाच्या बाबतीतही एअरटेलची कामगिरी नोंद घेण्यासारखी ठरली आहे. एअरटेलचा सरासरी डाउनलोड स्पीड ३८.४ एमबीपीएस आणि अपलोड स्पीड २६.७ एमबीपीएस नोंदवण्यात आला. बीएसएनएलचा डाउनलोड स्पीड ३७.९ एमबीपीएस व अपलोड स्पीड २५.९ एमबीपीएस, तर जिओचा डाउनलोड स्पीड ३०.५ एमबीपीएस आणि अपलोड स्पीड २१ एमबीपीएस इतका होता. फिक्स्ड वायरलेस ॲक्सेस (FWA) या ब्रॉडबँड सेवाप्रकारातही एअरटेलने पाचही श्रेणींमध्ये पहिले स्थान मिळवले. या सेवेमध्ये एअरटेलचा सरासरी डाउनलोड स्पीड ३२.४ एमबीपीएस आणि अपलोड स्पीड २०.७ एमबीपीएस नोंदवण्यात आला. जिओचा डाउनलोड स्पीड २५.७ एमबीपीएस आणि अपलोड स्पीड १७.१ एमबीपीएस होता. नेटवर्कच्या विश्वासार्हतेच्या निकषावर एअरटेलला ४५० गुण, तर जिओला ३८२ गुण मिळाले.

गाडीला कट मारल्याच्या कारणावरून अल्पवयीन मुलांचा तरुणावर हल्ला

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : गाडीला कट मारल्याच्या किरकोळ कारणावरून तीन अल्पवयीन मुलांनी तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केला. शिवम बाळासाहेब करमारे (वय, २६) हे या हल्ल्यात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शिवम करमारे हे दुचाकी मोटारसायकलवरून जात असताना येथील तिन्हेवाडी रस्त्यावर दुपारी पावणेतीनच्या सुमारास ही घटना घडली. काही दिवसांपूर्वी गाडीला कट मारल्याच्या कारणावरून यांच्यात वाद झाला होता. याच जुन्या वादाचा राग मनात धरून तीन अल्पवयीन मुलांनी भररस्त्यात शिवम करमारे यांची वाट अडवली. आणि अचानक त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात करमारे गंभीररित्या जखमी झाले. हल्लेखोरांनी करमारे यांच्या डोक्यावर, पाठीवर आणि हातावर बेछूट वार केले. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात करमारे यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. या हल्ल्यानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी शिवम करमारेंच्या भावाने खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तिन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी पुढील कारवाईला सुरुवात केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे पुणेकरांसाठी उपलब्ध करून द्यावीत

- रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



पुणे (आरंभ पर्व) : लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियममधून महाराष्ट्रात आणण्यात आलेली छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक 'वाघनखे' पुणे येथील शिवप्रेमी आणि नागरिकांना पाहण्यासाठी पुण्यात प्रदर्शनास ठेवावीत, अशी मागणी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांना निवेदन पाठवून ही मागणी लावून धरली आहे. राज्य शासनाच्या सध्याच्या नियोजनानुसार ही ऐतिहासिक वाघनखे सातारा, नागपूर, कोल्हापूर आणि सध्या मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वास्तुसंग्रहालयात प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली आहेत. मात्र, या संपूर्ण वेळापत्रकात पुणे शहराचा समावेश नसल्याने पुणेकरांमध्ये आणि शिवप्रेमींमध्ये नाराजीची भावना आहे. या मागणीबाबत बोलताना राहुल डंबाळे म्हणाले की, "पुणे ही स्वराज्याची भूमी असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणाचा आणि पराक्रमाचा इतिहास या मातीशी जोडलेला आहे. पुण्यात देशभरातून शिक्षण आणि नोकरीसाठी आलेले लाखो तरुण, विद्यार्थी आणि स्थानिक शिवभक्त राहतात. प्रत्येकाला मुंबईला जाऊन ही वाघनखे पाहणे शक्य नाही. त्यामुळे राज्य शासनाने लंडनच्या संग्रहालयाशी विशेष पाठपुरावा करून पुण्यातही या वाघनखांचे प्रदर्शन भरवावे, जेणेकरून पुणेकरांना आपल्या राजाच्या पराक्रमाचे प्रतीक जवळून पाहता येईल." पुण्यातील सुरक्षित आणि ऐतिहासिक वास्तूमध्ये या प्रदर्शनाचे आयोजन केल्यास लाखो शिवभक्तांना त्याचा लाभ घेता येईल, असेही डंबाळे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

कळंब-महाळुंगे फाट्यावर बसस्थानकाची प्रतीक्षा कायम

- मासे-चिकनच्या दुर्गंधीने प्रवासी त्रस्त!
- उन्हात-पावसात एसटीची वाट पाहण्याची वेळ
- पाचहून अधिक विक्रेत्यांची दुकाने, मासे विक्री अन्यत्र हलविण्याची प्रवाशांची मागणी



आंबेगाव-सदानंद शेवाळे (दै. आरंभ पर्व)

आंबेगाव तालुक्याच्या उत्तर भागातील ऐतिहासिक महाळुंगे पडवळ गावाकडे जाणाऱ्या कळंब-महाळुंगे फाट्यावर गेल्या अनेक वर्षांपासून प्रवाशांसाठी प्रतीक्षागृहाची सुविधा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे उन्हात, पावसात आणि वाऱ्यात एसटी बसची वाट पाहण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे. त्यातच या फाट्यावर सुरू असलेल्या मासे व चिकन विक्रीमुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील मासे-चिकन विक्री अन्यत्र हलवावी आणि प्रवाशांसाठी तातडीने बसस्थानक उभारावे, अशी मागणी जोर धरत आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्राणांची आहुती देणारे हुतात्मा बाबू गेनू यांचे महाळुंगे पडवळ हे जन्मगाव आहे. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक हुतात्माप्रेमी नागरिक त्यांच्या जन्मस्थळाला आणि स्मारकाला भेट देण्यासाठी येत असतात. तसेच कळंब-महाळुंगे फाट्यावरून येणेरे मार्गे शिवनेरी किल्ल्याकडे जाणारा मार्ग असल्याने या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते. पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या या महत्त्वाच्या फाट्यावरून महाळुंगे पडवळसह परिसरातील विविध गावांमध्ये जाण्यासाठी अनेक प्रवासी एसटी बसचा वापर करतात.

मात्र, प्रवाशांच्या सोयीसाठी येथे साधे प्रतीक्षागृहही उभारण्यात आलेले नाही. परिणामी, एसटी बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना रस्त्याच्या कडेला उभे राहावे लागते. त्यातच फाट्यावर पाचहून अधिक मासे व चिकन विक्रेत्यांनी दुकाने थाटल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. मासळीच्या उग्र वासामुळे प्रवाशांना नाक मुठीत धरून बसची वाट पाहावी लागत आहे. विशेषतः महिला आणि लहान मुलांची यामुळे मोठी गैरसोय होत आहे.

स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांहून अधिक काळ उलटला, तरी हुतात्मा बाबू गेनू यांच्या जन्मगावाकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या फाट्यावर प्रवाशांसाठी साधे प्रतीक्षागृह उभारता आले नाही, ही बाब दुर्दैवी आहे. एवढेच नव्हे, तर हुतात्मा बाबू गेनू यांच्या गावाकडे जाणारा दिशादर्शक फलकही या ठिकाणी नसल्याने बाहेरून येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत आहे.

प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रवाशांसाठी तातडीने बसस्थानक अथवा प्रतीक्षागृह उभारावे, दिशादर्शक फलक लावावा आणि मासे-चिकन विक्रीची दुकाने अन्यत्र हलविण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी केली आहे.

विक्रेत्यांशी चर्चा करून निर्णय घेणार – कमलेश वर्पे

कळंबचे उपसरपंच कमलेश वर्पे म्हणाले की, फाट्यावरील मासे विक्रेत्यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून घेण्यात येईल. त्यांच्याशी चर्चा करून या प्रश्नावर योग्य निर्णय घेण्यात येईल.

एंजेल वन देशातील दुसऱ्या क्रमांकाची स्टॉकब्रोकिंग कंपनी

मुंबई (दै. आरंभ पर्व)

देशातील भांडवली बाजारात आपले स्थान अधिक मजबूत करत एंजेल वन लिमिटेडने महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या (एनएसई) ताज्या रिपोर्ट 1C नुसार, ॲक्टिव्ह क्लायंटच्या संख्येच्या बाबतीत एंजेल वन भारतातील दुसऱ्या क्रमांकाची स्टॉकब्रोकिंग कंपनी ठरली आहे. ऑक्टोबर २०२६ अखेर कंपनीकडे ६९.९८ लाख ॲक्टिव्ह क्लायंट असून, एनएसईवरील एकूण ४.६७ कोटी ॲक्टिव्ह क्लायंटपैकी कंपनीचा बाजारहिस्सा १४.९७ टक्के आहे.

ऑक्टोबर महिन्यात कंपनीने एनएसईवर २.४३ लाख नवीन नेट ॲक्टिव्ह क्लायंट जोडले. यामुळे रिटेल गुंतवणूकदारांचा भांडवली बाजारातील वाढता सहभाग आणि तंत्रज्ञानाधारित गुंतवणूक प्लॅटफॉर्मला मिळणारा प्रतिसाद अधोरेखित झाला आहे.




- ऑक्टोबरमध्ये २.४३ लाख नवीन ॲक्टिव्ह क्लायंटची भर; एकूण ग्राहकसंख्येने ओलांडला ४ कोटींचा टप्पा

दरम्यान, ऑक्टोबर २०२६ मध्ये एंजेल वनच्या एकूण क्लायंटची संख्या वार्षिक आधारावर १७.४ टक्क्यांनी वाढून ४.०६ कोटींवर पोहोचली. कंपनीने प्रथमच ४ कोटी ग्राहकांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे. विशेष म्हणजे, ऑक्टोबर महिन्यात कंपनीने ६.६ लाख नवीन क्लायंट जोडले असून, गेल्या नऊ महिन्यांतील ही सर्वाधिक मासिक वाढ ठरली आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर महादेवांच्या चरणी दिलीप वळसे पाटील यांचे साकडे

- दुष्काळातून महाराष्ट्राला दिलासा मिळावा यासाठी प्रार्थना
- भीमाशंकर विकास आराखड्यातील कामांचा घेतला आढावा
- दुसऱ्या टप्प्यातील कामांबाबत मंदिर प्रशासन व अधिकाऱ्यांशी चर्चा



आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे नेहमीच आपल्या जनतेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल व्हावी म्हणून कार्यरत असणारे माजी सहकार मंत्री नामदार दिलीप वळसे पाटील यांनी सहकाऱ्यांसमवेत श्री भीमाशंकर महादेवांचे मनोभावे दर्शन घेतले. सध्या निसर्गाच्या अवकृपेमुळे संपूर्ण महाराष्ट्राला दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. या संकटातून महाराष्ट्राला दिलासा मिळावा, शेतकरी बांधवांवर निसर्गाची कृपा व्हावी आणि राज्यात समाधानकारक पाऊस पडून सुबत्ता नांदावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी भगवान भीमाशंकरांच्या चरणी केली.

दर्शनानंतर दिलीप वळसे पाटील यांनी आपल्या प्रयत्नांतून सुरू असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यांतर्गत विविध विकासकामांचा आढावा घेतला. विकास आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात सुरू असलेल्या कामांची सद्यःस्थिती जाणून घेतली. तसेच दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित असलेल्या विकासकामांबाबत मंदिर प्रशासन, स्थानिक ग्रामस्थ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. श्रीक्षेत्र भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून, येथे देशभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेली सर्व कामे जलद गतीने, नियोजनबद्ध पद्धतीने आणि उत्तम दर्जाची पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना दिलीप वळसे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पूर्वा वळसे पाटील, सभापती कैलास काळे, सुरेश कौदरे, शीला लोहकरे, मारुती लोहकरे तहसीलदार राहुल सारंग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सूर्यकांत कुंभार, पोलीस निरीक्षक सागर पवार, प्रकाश घोलप, संजय गवारी, प्रवीण पारधी, वैभव उंडे, दिलीप लोखंडे, संतोष सैद, प्रेम थोरात यांच्यासह ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

६५ ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञता सन्मान सोहळा उत्साहात

- ८० वर्षांवरील ज्येष्ठांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव
- ग्रामस्थांचा संस्कार जपणारा स्तुत्य उपक्रम



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक अरुणजी असावले सर आणि निरगुडे गावचे युवा नेतृत्व मंगेशजी जगदाळे यांनी केले. ज्येष्ठांचा सन्मान, संस्कारांचा गौरव आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा हा सोहळा निरगुडे ग्रामस्थांच्या एकजुटीचे, सामाजिक जाणीवेचे आणि ज्येष्ठांप्रती असलेल्या कृतज्ञतेचे सुंदर उदाहरण ठरला.

जुन्नर (मारुती मिंडे) (दै. आरंभ पर्व)

ज्येष्ठांचा आदर, त्यांच्या अनुभवाचा सन्मान आणि त्यांनी जपलेल्या संस्कारांच्या वारशाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने निरगुडे ग्रामस्थांच्या वतीने गावातील ८० वर्षांवरील ६५ ज्येष्ठ नागरिकांचा कृतज्ञता सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सर्व ज्येष्ठ नागरिकांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. शिवनेरीच्या पवित्र भूमीत स्वाभिमानाचा इतिहास घडला असून, याच मातीत अनेक पिढ्यांनी संस्कारांचा वारसा जपला आहे. हा वारसा पुढे नेण्याच्या भावनेतून महाराष्ट्र शासनाचा 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त असलेल्या निरगुडे गावात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम ग्रामस्थांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणारा ठरला. ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यभराच्या कष्टांचा आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करत त्यांना सन्मानपूर्वक शाल व श्रीफळ प्रदान करण्यात आले. पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. ज्येष्ठांच्या अनुभवातून नव्या पिढीला संस्कार, मार्गदर्शन आणि जीवनमूल्यांचा वारसा मिळावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निरगुडे गावचे माजी पोलीस अधिकारी वसंतराव मारुती ताजणे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त आयएफएस अधिकारी रंगनाथजी नाईकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष एकनाथजी डोंगरे, संघाचे सदस्य आतार सर, निरगुडे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष तथा निवृत्त ग्रामविस्तार अधिकारी सुरेशजी रोकडे, भाऊसाहेब कुलस्वामी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष तान्हाजी शेठ शिंदे, मारुती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब दादा रोकडे, निरगुडे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन राजेंद्रजी शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष सुभाषदादा शिंदे, माजी सैनिक विष्णुजी जेजुरकर, माजी सरपंच वसंतदादा रोकडे, सुभाषजी रोकडे, रोहिदासजी ताजणे, आनंदजी जेजुरकर, उद्धवजी शिंदे, प्रकाशजी ताजणे, विठ्ठल आप्पा शिंदे, राजेंद्रजी रोकडे, एकनाथजी मंडलिक आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याला गावातील महिला, युवक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. ज्येष्ठांचा सन्मान हा केवळ व्यक्तींचा गौरव नसून त्यांच्या आयुष्यभराच्या त्यागाचा, कष्टाचा आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा सन्मान असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

आशीर्वादने सणातील सर्जनशीलतेला दिली नवी ओळख

पुणे (दै. आरंभ पर्व)

या दिवाळीत सात रांगोळी कलाकृती ज्या घरांमध्ये साकारल्या, त्या घरांच्या चौकटीबाहेर पडून आता देशभरातील बिलबोर्डच्या मोठ्या सार्वजनिक कॅनव्हासवर झळकणार आहेत. आशीर्वादच्या 'घर लाएं आशीर्वाद'च्या दुसऱ्या पर्वांतर्गत, विजेत्या रांगोळ्या पुणे येथे एक आठवडा बिलबोर्डवर प्रदर्शित केल्या जातील. त्यामुळे सहभागी कलाकारांना आपल्या शहरातच स्वतःची सणासुदीची कल्पकता मोठ्या स्वरूपात साजरी होताना पाहता येईल. पहिल्या पर्वाच्या यशानंतर, 'घर लाएं आशीर्वाद – 2'ने कुटुंबांसाठी WhatsAppवर एक आकर्षक अनुभव उपलब्ध करून दिला. सहभागी स्वतः तयार केलेल्या रांगोळ्या शेअर करू शकत होते किंवा AIच्या मदतीने डिझाइन तयार करून लोकप्रिय अभिनेत्री रूपाली गांगुली यांच्याकडून वैयक्तिक सणाच्या शुभेच्छा मिळवू शकत होते. या मोहिमेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि 50,000 हून अधिक प्रवेशिका आल्या. कुटुंबांनी आपली सर्जनशीलता दाखवण्यासाठी आणि रांगोळीची जपलेली परंपरा आपल्या खास पद्धतीने साजरी करण्यासाठी या उपक्रमाचा वापर केला. निवडक कलाकृती घरांमधून बिलबोर्डवर नेत, आशीर्वादने वैयक्तिक सणोत्सवी अभिव्यक्तीचे रूपांतर सर्व समुदायांना पाहता आणि साजरे करता येईल अशा भव्य प्रदर्शनात केले.



- सात विजेत्यांच्या रांगोळ्या आता बिलबोर्डवर झळकणार
- १,००० सहभागी जिंकले सोन्या-चांदीची नाणी आणि Amazon व्हाउचर्स

क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती उत्साहात साजरी

- समाज बांधवांकडून अभिवादन!
- 'लहुजी वस्ताद हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान!'
- संदीप भोंग यांचे प्रतिपादन; शिक्षण, संघटन आणि एकजुटीचा संदेश



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

क्रांती, शौर्य, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार समाजापर्यंत पोहोचविणारे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती निमगाव केतकी (ता. इंदापूर) येथील अण्णाभाऊ साठे नगरमध्ये शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरी करण्यात आली. यानिमित्त समस्त समाज बांधवांच्या वतीने लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी 'जय लहुजी, जय अण्णाभाऊ साठे'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महापुरुषांच्या विचारांचा जागर करत सामाजिक एकजूट आणि शैक्षणिक प्रगतीचा संकल्प यावेळी करण्यात आला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संदीप भोंग यांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे हे केवळ मातंग समाजाचे नव्हे, तर संपूर्ण बहुजन समाजाचे क्रांतिगुरू आणि देशाचे प्रेरणास्थान आहेत. गंज पेठेतील आखाड्यातून त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, वासुदेव बळवंत फडके यांसारख्या क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांतून स्वाभिमान, शौर्य आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद निर्माण झाली.

आज आपण शिक्षण घेत आहोत, नोकरी करीत आहोत आणि सन्मानाने जीवन जगत आहोत, यामागे लहुजी वस्ताद आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या महापुरुषांचे मोठे योगदान आहे. त्यांचे विचार घराघरांत पोहोचविणे, आपल्या मुलांना उच्च शिक्षण देऊन सक्षम बनविणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. समाज बांधवांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने राहावे, शिक्षण आणि संघटनाला प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या विचारांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला अध्यक्ष योगेश मिसाळ, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अजित मिसाळ, पै. शशिकांत मिसाळ, शेतकरी संघटनेचे दादा किरकत, दत्ताग्रय मिसाळ, भारत मिसाळ, नितीन मिसाळ, शिवदत्त मिसाळ यांच्यासह अण्णाभाऊ साठे नगरमधील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन आणि आभार प्रदर्शन समस्त समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले. महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देणारी ही जयंती उत्साहात पार पडली.

पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये मोकाट जनावरांचे थैमान
वाहनचालकांचा प्रवास जीवघेणा!

मुख्य रस्त्यांवरच जनावरांचा ठिय्या; अपघातांचा धोका वाढला, महापालिका अधिकारी मात्र सुस्त



पुणे-निरंजन उर्फ सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

पुणे आणि पिंपरी-चिंचवड या राज्यातील महत्त्वाच्या आणि मोठ्या महसूल मिळवून देणाऱ्या महानगरपालिका म्हणून ओळखल्या जातात. मात्र, या दोन्ही महानगरपालिका हद्दीत मोकाट जनावरांनी मुख्य रस्त्यांवरच ठाण मांडल्याने वाहनचालकांचा प्रवास दिवसेंदिवस धोकादायक बनत आहे. रस्त्यांच्या मध्यभागी बसणारी किंवा अचानक वाहनांसमोर येणारी जनावरे अपघातांना निमंत्रण देत असून, वाहनचालकांच्या जीविताचा प्रश्न गंभीर बनला आहे. एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच महापालिका प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पूर्वी पिंपरी-चिंचवड परिसरातील प्रशासकीय कारभार पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून चालविला जात होता. मात्र, या परिसरात शासकीय, निमशासकीय अधिकारी-कर्मचारी आणि कामगारवर्गाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने स्वतंत्र पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र महापालिका अस्तित्वात आल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या समस्या मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, आजही मोकाट जनावरांसारख्या मूलभूत समस्येवर ठोस उपाययोजना होत नसल्याचे चित्र दिसत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विविध भागांमध्ये मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. दिघी परिसरातील पुणे-आळंदी मार्गावर रात्रंदिवस मोकाट जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेली दिसतात. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे. त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिका हद्दीतील विश्रांतवाडी, धानोरी आणि लोहगाव या प्रमुख रस्त्यांवरही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी ही समस्या अधिक गंभीर बनते. अनेक ठिकाणी महापालिकेच्या विद्युत विभागाकडून बसविण्यात आलेले पथदिवे बंद असल्याने रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा वाहनचालकांना अंदाज येत नाही. अचानक समोर आलेल्या जनावरांना धडक बसून वाहनचालक जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. दुचाकीस्वारांसाठी तर ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांसमोर अचानक जनावर आल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिघी हा परिसर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या सीमेलगत असल्याने मोकाट जनावरांच्या समस्येबाबत तक्रार नेमकी कोणत्या प्रशासनाकडे करायची, असा प्रश्नही नागरिकांसमोर निर्माण होतो. दिघी परिसर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत, तर विश्रांतवाडी परिसर पुणे महानगरपालिकेत येत असल्याने दोन्ही प्रशासनांनी आपापल्या हद्दीतील समस्यांवर जबाबदारीने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. मात्र, नागरिकांकडून तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रस्त्यांवरील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे, त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविणे आणि रात्रीच्या वेळी पथदिवे सुरू ठेवणे यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे. मात्र, प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल झालेला दिसत नसल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित एवढा गंभीर प्रश्न असतानाही संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप केला जात आहे.

मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची?

पुणे महानगरपालिकेत काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी मोकाट जनावरांच्या समस्येवर ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र, या मागणीला अनेक महिने उलटूनही प्रत्यक्षात प्रभावी कारवाई झालेली नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना न झाल्यास नागरिकांना महापालिका प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याची वेळ येऊ शकते, अशी भावना व्यक्त होत आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने आता तरी जागे होऊन मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच बंद पथदिवे तातडीने सुरू करून अपघातप्रवण ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांकडून होत आहे. एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा प्रशासनाने वेळीच जागे होणे गरजेचे आहे.

- बेकायदा खोदकामामुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात!
- कारखाना रोडजवळ पाईपलाईनसाठी डांबरी रस्ता खोदला
- चार ते पाच अपघातांत दोघे गंभीर जखमी, एकाचे डोके फुटले तर दुसऱ्याचा पाय फ्रॅक्चर
- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षावर ग्रामस्थांचा संताप, संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी!

निमगाव केतकीत रस्त्याच्या मधोमध
जीवघेणी चारी



इंदापूर (दै. आरंभ पर्व)

इंदापूर-बारामती मुख्य रस्त्यावरील निमगाव केतकी येथील कारखाना रोडजवळ बेकायदा पाईपलाईन टाकण्यासाठी डांबरी रस्ता खोदून तयार करण्यात आलेली उघडी चारी वाहनचालकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा बनली आहे. स्वतःच्या सोयीसाठी सार्वजनिक रस्त्याचे खोदकाम करून पाईपलाईन टाकण्यात आली; मात्र काम पूर्ण झाल्यानंतर खोदलेली चारी व्यवस्थित बुजविण्यात न आल्याने रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा निर्माण झाला आहे. या धोकादायक चारीमुळे आतापर्यंत चार ते पाच लहान-मोठे अपघात घडल्याची माहिती समोर आली असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासनाने लाखो रुपये खर्च करून तयार केलेल्या डांबरी रस्त्याचे कोणतीही परवानगी न घेता खोदकाम करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित व्यक्तीने पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ता फोडला; मात्र त्यानंतर चारीची योग्य पद्धतीने दुरुस्ती किंवा डांबरीकरण केले नाही. परिणामी रस्त्याच्या मधोमध तयार झालेली ही चारी दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनांसाठीही धोकादायक ठरत आहे. या चारीमुळे झालेल्या अपघातांमध्ये एका दुचाकीस्वाराचे डोके फुटून तो गंभीर जखमी झाला, तर दुसऱ्या व्यक्तीचा पाय फ्रॅक्चर झाला आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यावरील अपुरी दृश्यमानता आणि भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे हा खड्डा चालकांच्या लक्षात येत नाही. अचानक चारी समोर आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. रस्त्याच्या मधोमध असलेली ही जीवघेणी चारी भविष्यात आणखी मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देऊ शकते. एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून परवानगीशिवाय रस्ता खोदणाऱ्या संबंधित व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थ व वाहनचालकांनी केली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून सदरची चारी व्यवस्थित बुजवावी, रस्त्याचे पुन्हा दर्जेदार डांबरीकरण करावे आणि भविष्यात अशा प्रकारची बेकायदा खोदकामे होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.

नागरिकांच्या जीविताशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासन किती तत्परतेने लक्ष देणार, तसेच संबंधितांवर प्रत्यक्ष कारवाई कधी होणार, याकडे आता निमगाव केतकी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



भोरमधील जय हनुमान मंडळात उत्साहात दीपोत्सव संपन्न

- एक हजार पणत्यांच्या प्रकाशाने परिसर उजळून निघाला

भोर (आरंभ पर्व) : दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून भोर शहरातील मानाचा पहिला गणपती असणाऱ्या 'जय हनुमान मंडळात' एका भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. मांगल्याचे प्रतीक असणाऱ्या दीपावली सणात या दीपोत्सवामुळे अधिकच बहर आला असून, संपूर्ण मारुती मंदिर परिसर व परिसर एक हजार पणत्यांच्या तेजाने उजळून निघाल्याने संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. या नेत्रदीपक कार्यक्रमाचे नियोजन मंडळाचे अध्यक्ष विशाल कंक, स्वप्नील किवळे, संदेश देशपांडे, सचिन रोमण, मयूर चोरघे, सचिन भैलके, अविनाश नांदघुरे, समीर किवळे आणि गणेश चोरघे यांनी अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडले. शहरातील मानाचा पहिला गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जय हनुमान मंडळामार्फत केवळ गणेशोत्सवच नव्हे, तर वर्षभर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले जात असुन यामध्ये प्रामुख्याने हनुमान जन्मोत्सव, गणेश जयंती, नवरात्रोत्सव, दुर्गामाता दौड, बलिदान मास आणि शिवजयंती उत्साहात साजरी केली जाते. तसेच पारंपारिक बैलगाडा शर्यतीचे आयोजन करून ग्रामीण संस्कृती जपासली जाते व ऐतिहासिक ठेवा टिकवून ठेवण्या साठी आणि तरुणांमध्ये गड-किल्ल्यांचा इतिहास अबाधित राखण्यासाठी 'किल्ले स्पर्धेचे' यशस्वी नियोजन केले जाते. मंडळाच्या या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याबद्दल शहरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

रेसिंग दुचाकींच्या वेगाने नागरिकांचा जीव धोक्यात; कार्यकर्त्याचा मृत्यू



आंबी (आरंभ पर्व) : पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्राकडे जाणाऱ्या रस्त्यांवर रेसिंग दुचाकींचा वाढता वेग आता नागरिकांच्या जीवावर बेतू लागला आहे. सोनापूर पेठ येथील धोकादायक वळणावर भरधाव रेसिंग दुचाकीने धडक दिल्याने आंबी येथील सामाजिक कार्यकर्ते रामदास काशिनाथ निवंगुणे (वय ५२) यांचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून रस्त्यावरील बेफाम वेगाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रत्येक शनिवार-रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी पानशेतच्या पाणलोट क्षेत्राकडे मोठ्या संख्येने रेसिंग दुचाकींची ये-जा सुरू असते. या दुचाकी अत्यंत वेगाने चालवल्या जात असल्याने स्थानिक नागरिक, पादचारी आणि वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक रस्त्यांवर अशा प्रकारे वेगाने दुचाकी चालविण्यास वाहतूक विभाग आणि पोलिसांची परवानगी आहे का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

हवेली खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीत दोन पॅनेलमध्ये प्रतिष्ठेची लढत!

- चार दशकांची बिनविरोध निवडणुकीची परंपरा खंडित
- ३०३ मतदार ठरविणार सहकार क्षेत्रातील नवे नेतृत्व, दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

हवेली तालुक्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, हवेली तालुका खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीत दोन पॅनेलमध्ये थेट लढत रंगणार आहे. तालुक्यातील अनेक मातब्बर नेत्यांनी या निवडणुकीत आपली प्रतिष्ठा पणाला लावली असल्याने ही निवडणूक केवळ सहकारी संस्थेपुरती मर्यादित न राहता हवेलीतील राजकीय वर्चस्वाची लढाई ठरण्याची चिन्हे आहेत.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विकास दांगट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) हवेली युवक तालुकाध्यक्ष संदीप गोते यांच्या नेतृत्वाखाली 'अण्णासाहेब मगर परिवर्तन पॅनेल' निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. तर पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष प्रकाश म्हस्के, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप काळभोर, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रदीप कंद, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले आणि बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांच्या नेतृत्वाखाली 'सहकार महर्षी अण्णासाहेब मगर शेतकरी विकास पॅनेल' निवडणुकीच्या मैदानात उतरले आहे.

शिळीम, कुंड, राजीवडीतील १५० कुटुंबांची दिवाळी झाली गोड!

- 'श्री आदिनाथ भक्तामर हीलिंग सेंटर' आणि 'दी पुना मर्चंट्स चेंबर'चा स्तुत्य उपक्रम
- जीवनावश्यक वस्तूंचे किट आणि दिवाळी फराळाचे वाटप



भोर (दै. आरंभ पर्व)

सामाजिक बांधिलकी जपत दुर्गम आणि दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या उद्देशाने पुणे येथील 'श्री आदिनाथ भक्तामर हीलिंग सेंटर' आणि 'दी पुना मर्चंट्स चेंबर' यांच्या संयुक्त सहकार्याने भोर तालुक्यातील शिळीम, कुंड आणि राजीवडी येथील १५० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे किट आणि दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून ग्रामस्थांकडून आयोजकांचे कौतुक होत आहे.

या उपक्रमांतर्गत प्रत्येक कुटुंबाला साखर, खाद्यतेल, बेसनपीठ, रवा, मसाले, शेवई, मैदा, फरसाण, चिवडा, लाडू आणि पणत्या अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेले किट देण्यात आले. सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना या मदतीचा मोठा आधार मिळाला.

स्व. हिराबाई गिरधारीलाल खाबिया यांच्या आशीर्वादाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. 'श्री आदिनाथ भक्तामर हीलिंग सेंटर'च्या संचालिका स्नेहल चोरडिया, सुजाता शिंगवी आणि सीमा सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'दी पुना मर्चंट्स चेंबर' आणि शोभा मुथा यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे वरिष्ठ अधिकारी गौरव मुनोत, पसुरे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मनोज धुमाळ, सरपंच हिना डेरे, माजी सरपंच अरुण राजीवडे, मारुती डेरे, सुरेश बांदल, शरद बांदल, भगवान बांदल, काशिनाथ राजीवडे, प्रकाश खोपडे, अमित नवघणे आणि दादासाहेब भोरे आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय स्थानिक ग्रामस्थ, महिला आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना पसुरे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मनोज धुमाळ म्हणाले, "दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण आणि दुर्गम भागातील सर्वसामान्यांची दिवाळी गोड करण्यासाठी सेवा करणे हा अत्यंत आनंददायी आणि आत्मिक समाधान देणारा अनुभव आहे."

ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांपर्यंत मदतीचा हात पोहोचवून त्यांच्या सणातील आनंद द्विगुणित करणारा हा उपक्रम सामाजिक एकोपा, माणुसकी आणि सेवाभावाचे उत्तम उदाहरण ठरला. अशा उपक्रमांमुळे समाजातील विविध घटकांमध्ये सहकार्याची भावना अधिक दृढ होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

जुन्नरमध्ये भाजी विक्रेत्यांविरोधात
अतिक्रमण पथकाची कारवाई

भाजी विक्रेत्यांमध्ये नाराजी; पर्यायी भाजी मंडईतील जागा अपुरी असल्याची विक्रेत्यांची तक्रार

जुन्नर : महेश कदम (दै. आरंभ पर्व)


जुन्नर शहरातील रस्त्यांवर आणि सार्वजनिक जागांवर भाजी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात नगरपरिषदेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यालगत व्यवसाय करणाऱ्या भाजी विक्रेत्यांना हटविण्यात आल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. कारवाईला विरोध नसला तरी व्यवसायासाठी योग्य आणि पुरेशी पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विक्रेत्यांकडून होत आहे.

जुन्नर शहरातील शंकरपुरा पेठ, बसस्थानक परिसर तसेच अंतर्गत रस्त्यांवर अनेक लहान-मोठे भाजी विक्रेते व्यवसाय करतात. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय असून, भाजी विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. शहरातील वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाचा प्रश्न लक्षात घेऊन नगरपरिषद प्रशासनाने ही कारवाई केली आहे. दरम्यान, नगरपरिषदेने भाजी विक्रेत्यांसाठी भाजी मंडईमध्ये पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात या मंडईतील जागा अत्यंत अपुरी असल्याची तक्रार विक्रेत्यांनी केली आहे. मंडईमध्ये भाजी विक्रीसाठी पुरेशी जागा नसल्याने भाजीच्या पाच पाट्यादेखील व्यवस्थित ठेवता येत नाहीत, अशी व्यथा विक्रेत्यांनी मांडली आहे.



एकीकडे शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त आणि वाहतुकीसाठी मोकळे ठेवणे आवश्यक आहे, तर दुसरीकडे गरीब भाजी विक्रेत्यांच्या रोजगाराचाही विचार होणे गरजेचे आहे. केवळ अतिक्रमण हटवून प्रश्न सुटणार नसून, विक्रेत्यांना व्यवसाय करता येईल अशा सोयीस्कर आणि पुरेशा जागेची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने भाजी मंडईतील जागेची प्रत्यक्ष पाहणी करून विक्रेत्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि त्यांना पुरेशी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भाजी विक्रेत्यांकडून होत आहे.

झी क्लासिकतर्फे 'अमर प्रेमनाथ' विशेष उपक्रम



मुंबई (दै. आरंभ पर्व)

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते प्रेमनाथ यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त झी क्लासिक वाहिनीने 'अमर प्रेमनाथ' या विशेष उपक्रमाचे आयोजन केले आहे. अभिनयातील वेगळेपण, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि पडद्यावरील दमदार उपस्थितीच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रेमनाथ यांच्या समृद्ध चित्रपट कारकिर्दीला या उपक्रमातून उजाळा देण्यात येणार आहे. नोव्हेंबर महिनाभर चालणाऱ्या या विशेष सोहळ्यात चार भागांची माहितीपट मालिका, त्यांचे सुपुत्र मॉन्टी नाथ यांची भावपूर्ण आदरांजली आणि त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांचा समावेश असणार आहे. प्रेमनाथ यांचा हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रवास अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीला नायक म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या प्रेमनाथ यांनी पुढील काळात चरित्र अभिनेत्याच्या भूमिकांमधूनही प्रेक्षकांची विशेष पसंती मिळवली. बदलत्या चित्रपटसृष्टीसोबत आपल्या अभिनयशैलीत नवनवीन प्रयोग करत त्यांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या अभिनयातील सहजता, प्रभावी संवादफेक आणि व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण यामुळे त्यांच्या अनेक भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत.

'अमर प्रेमनाथ' या विशेष माहितीपट मालिकेतून त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पे उलगडले जाणार आहेत. त्यांच्या अभिनयप्रवासासोबतच भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदान आणि त्यांनी मागे ठेवलेल्या समृद्ध कलात्मक वारशावर या मालिकेत प्रकाश टाकण्यात येणार आहे.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे ८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ साळुंके ८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!